सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. ९ जून २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ५६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महायुद्धाचा भडका उडणार!

## शस्त्रसंधी असूनही अमेरिका-इस्रायलचे हल्ले सुरूच!





वृत्तसंस्था

तेहरान : मध्य पूर्वेतील परिस्थिती आता पूर्णपणे हाताबाहेर गेली असून, जागतिक महायुद्धाचा धोका निर्माण झाला आहे. आंतरराष्ट्रीय सागरी वाहतुकीला धोका निर्माण करणाऱ्या इराणच्या दोन ड्रोनना अमेरिकन लष्कराने होर्मुझच्या सामुद्रधुनीत हवेतच उडवून लावले आहे, अशी अधिकृत घोषणा अमेरिकेने केली आहे. दुसरीकडे, इस्रायली सैन्याने लेबनॉन आणि गाझावर भीषण हल्ले चढवून मोठी जीवितहानी केली आहे. या वाढत्या तणावादरम्यान पाकिस्तानने आता मध्यस्थीसाठी उडी घेतली असून, युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. या सगळ्या घडामोडींमुळे आता जग तिसऱ्या महायुद्धाकडे वळले जाणार की काय असा भीतीदायक प्रश्न उपस्थित झाला आहे.

दरम्यान, अमेरिकेने ड्रोन पाडल्यानंतर इस्रायली सैन्यही शांत बसले नाही. इस्लायलने लेबनॉनवर केलेल्या कारवाईत तिथल्या सैन्याचे तीन उच्चपदस्थ कमांडर ठार झाले आहेत. एवढेच नव्हे, तर गाझा परिसरातील एका छावणीवर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात किमान आठ पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला आहे. इस्रायल आणि अमेरिकेच्या या संयुक्त कारवायांमुळे इराण कमालीचा संतापला असून त्याने मित्र देशांवर हल्ले तीव्र केले आहेत. तसेच, तेहराननेही दावा केला आहे की, 'अमेरिकेने तेहरानच्या किनारी भागावर आधी हल्ले केले, त्याच कारवाईला प्रत्युत्तर म्हणून तेहरानने बहरीन आणि कुवेतवर क्षेपणास्त्रे डागली.' मात्र, इराणच्या या कृत्यामुळे संपूर्ण अरब जगतात खळबळ उडाली आहे. इजिप्त, जॉर्डन, कतार आणि सौदी अरेबिया या प्रमुख अरब राष्ट्रांनी एकत्र येत इराणने कुवेत आणि बहरीनवर केलेल्या या हल्ल्यांचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. इराण जाणीवपूर्वक प्रादेशिक शांतता धोक्यात आणत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, या संपूर्ण संघर्षात आता पाकिस्ताननेही उडी घातली आहे. पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नक्वी यांनी मध्यस्थ म्हणून इस्लामाबादचा एक अत्यंत महत्त्वाचा संदेश इराणचे सर्वोच्च नेते मोजताबा खामेनी यांच्याकडे सुपूर्द केला आहे. पण, इराणने अमेरिकेवरच खापर फोडले आहे, वॉशिंग्टनला तणाव कमी करण्यात आणि शांततेच्या मार्गावर परतण्यात कोणताही रस नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

दरम्यान, या वाढत्या संघर्षामुळे संयुक्त राष्ट्रांनी चिंता व्यक्त केली असून, जागतिक बाजारपेठेवर आणि कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर याचे गंभीर परिणाम होण्याची भीती वर्तवली जात आहे. रशिया आणि चीननेही या परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवले असून शांततेचे आवाहन केले आहे.

## शाळा भरण्यापूर्वीच पालकांना महागाईचा फटका!

### दप्तर, वॉटर बॉटल १५ ते २०% महाग; वह्यांच्या दरात मात्र मोठा दिलासा



तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : साहित्य व दप्तरांच्या किमतीत १५ ते २० टक्क्यांपर्यंत भाववाढ झाली. इंधन दरवाढीने कच्च्या मालाच्या किमती वाढल्या. त्यामुळे प्लास्टिक वस्तू जसे पेन, पेन्सिल, कंपास, पाणी बॉटलसह आणि दप्तर, टिफीन बॅगचे दर वाढले. जीएसटी कमी झाल्याने वह्यांच्या किमती कमी झाल्याने पालकांना जरा दिलासा मिळाला आहे.

येत्या १५ जूनपासून शाळा सुरू असणार असल्याने रविवारी औरंगपुऱ्यासह व संपूर्ण मार्केट व शालेय साहित्य विक्री दुकानांमध्ये पाय टाकायला जागा नव्हती. सुटीचा दिवस असला तरी या गर्दीला एक महत्त्वाचे कारण म्हणजे ठरावीक दुकानांतूनच साहित्य खरेदीची सक्ती असणे हेही होते. काही खासगी शाळांकडून ठरावीक दुकानांतूनच साहित्य खरेदीची सक्ती केली जाते. पण किमती कितीही वाढल्या, तरी आपल्या मुलांना चांगले शैक्षणिक साहित्य मिळावे म्हणून आई-वडिलांची धडपड होती.

मुलेही त्यांच्या आवडीच्या बॅग, कंपास, वह्या घेत होती. या वर्षी शैक्षणिक साहित्यांमध्ये वह्यांच्या किमती कमी झाल्या. पण दप्तर आणि इतर शालेय साहित्यांच्या किमतीत १५ ते २० टक्क्यांपर्यंत वाढ झाली. कागद, इंधन आणि उत्पादन खर्च वाढल्याने हे साहित्य महाग झाले. त्यामुळे अगोदरच इंधन दरवाढीचा सामना करणाऱ्या पालकांचे बजेट कोलमडले. या वर्षीदेखील वेगवेगळ्या फॅब्रिकची दप्तरे बाजारात उपलब्ध आहेत. यात पॉलिस्टर, नायलॉन, कॅनव्हास, डेनिम फॅब्रिकची दप्तरे दिसतात. दप्तरासाठी हलके नायलॉन किंवा पॉलिस्टर कापड, फोम, पीई फोम, स्पंज, झिप चेन, झिप रनर्स, प्लास्टिक, डी-रिंग्ज, हुक्स, पट्टी असा कच्चा माल लागतो. विक्रेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे सर्व साहित्य व प्लास्टिक आणि वाहतूक खर्च वाढल्याने शालेय साहित्याच्या किमती वाढल्या आहेत.

## भारताच्या अण्वस्त्र साठ्यात मोठी वाढ, आकडा १९० वर!

### चीनला लक्ष्य करणाऱ्या क्षेपणास्त्रांवर भारताचा भर

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या २०२६ च्या इअरबुक अहवालातून भारताच्या लष्करी आणि आण्विक ताकदीबाबत अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. या अहवालात नमूद केल्याप्रमाणे, भारताने २०२५ सालात आपल्या अण्वस्त्रांच्या साठ्यात वाढ करत अण्वस्त्रांची संख्या १९० वर पोहोचवली आहे. बदलत्या जागतिक आणि प्रादेशिक राजकारणाच्या पार्श्र्वभूमीवर, भारताने आता आपला मोर्चा चीनच्या संपूर्ण भूभागावर लक्ष केंद्रित करू शकणाऱ्या अत्यंत प्रगत आणि लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांच्या निर्मितीकडे वळवला आहे. अर्थात, या नव्या धोरणाबरोबरच आपला पारंपारिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानच्या हालचालींवरही भारताचे पूर्वीइतकेच बारकाईने लक्ष असल्याचे या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

या अत्यंत गंभीर लष्करी संघर्षाचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. या कारवाईदरम्यान भारताने पाकिस्तानच्या अण्वस्त्र संबंधित हवाई आणि क्षेपणास्त्र तळांवर थेट धडक कारवाई केली होती. सुदैवाने दोन्ही देशांनी वेळीच सामंजस्याची भूमिका घेतल्याने या तणावाचे रूपांतर मोठ्या युद्धात झाले नाही. मात्र, विशेष बाब म्हणजे याच काळात दोन्ही देशांनी पहिल्यांदाच प्रत्यक्ष लष्करी संघर्षात 'सायबर ऑपरेशन्स'चा प्रभावी वापर केला. दोन आण्विक देशांमधील युद्ध आणि बचावाचे हे बदलत चाललेले तंत्र भविष्यातील आव्हाने अधिक गुंतागुंतीची करत असल्याचे यातून दिसून आले आहे. संरक्षण खर्च आणि लष्करी आधुनिकीकरणाच्या बाबतीतही भारताने जगातील आघाडीच्या देशांमध्ये स्थान मिळवले आहे. २०२५ या वर्षात भारताचा एकूण संरक्षण खर्च ८.९ टक्क्यांच्या मोठ्या वाढीसह तब्बल ९२.१ अब्ज डॉलर्सवर पोहोचला आहे. या भरघोस वाढीव तरतुदीमुळे अमेरिका, चीन, रशिया आणि जर्मनी या देशांच्या पाठोपाठ भारत आता जगातील पाचवा सर्वात मोठा लष्करी खर्च करणारा देश बनला आहे.

## एअर इंडियाच्या तीन विमानांना वादळाचा तडाखा



वृत्तसंस्था

नवी दिल्ली: दिल्लीत इंदिरा गांधी आंतराष्ट्रीय विमातळावर रविवारी संध्याकाळी ४:३० च्या दरम्यान अचानक जोरात वादळी वारे वाहू लागले. या वाऱ्यामुळे विमानांजवळ ठेवलेली शिडी आपल्या जागेवरून सरकली आणि थेट एअर इंडियाच्या तीन लहान विमानांना धडकली. या धडकेमुळे तिन्ही विमानांचे नुकसान झाले. विमानतळावरील या घटनेनंतर एअर इंडियाने तिन्ही लहान विमानांची उड्डाणं रद्द केली आहेत. दुरुस्तीसाठी आणि तपासणीसाठी तिन्ही विमाने सेवेतून काढून घेण्यात आली आहेत.वादळी वाऱ्यांबाबत पूर्वसूचना देण्यात आली नव्हती. यामुळे ग्राउंड स्टाफने वादळी वाऱ्यांना सामोरे जाण्यासाठी तयारी केली नव्हती. वादळ आले त्यावेळी विमानांजवळ ठेवलेली शिडी (जिने / ग्राउंड हँडलिंग उपकरण) आपल्या जागेवरून सरकली आणि थेट एअर इंडियाच्या तीन लहान विमानांना धडकली, अशी माहिती दिल्ली इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड या संस्थेने दिली आहे. विमानांना धडकलेली शिडी ही एअर इंडिया इंजिनिअरिंग सर्व्हिसेस आणि इंडिगोच्या ग्राउंड हँडलिंग ऑपरेशन्सची होती. यामुळे विमान वाहतुकीवर परिणाम झाला. या प्रकरणी नियमानुसार चौकशी सुरू असल्याचेही दिल्ली इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड या संस्थेने सांगितले.एअर इंडियाच्या बाधित झालेल्या तीन विमानांपैकी दोन लवकरच सेवेत परत येण्याची शक्यता आहे, तर तिसऱ्या विमानाच्या दुरुस्तीला अधिक वेळ लागू शकतो.भारतीय हवामान विभागाने दिल्लीला मेघगर्जनेसह पावसासाठी तयार राहण्याचा सल्ला दिला आहे, कारण पुढील काही दिवस हवामान अस्थिर राहण्याची शक्यता आहे.

११ जूनपर्यंत मुंबई आणि ठाण्यात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तवला आहे, तसेच महाराष्ट्राच्या काही भागांत सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता वर्तवली आहे.

## राज्यातील रेल्वे मार्ग फाटक मुक्त होणार

तभा वृत्तसेवा

मुंबई: राज्यातील एकाही रेल्वे मार्गावर फाटक राहता कामा नये. रेल्वे फाटकमुक्त महाराष्ट्रासाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा युद्धपातळीवर उभारण्यात याव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिले. 'महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळा'मार्फत (महारेल) राज्यात उभारण्यात येणाऱ्या एकूण १३१ रेल्वे उड्डाणपुलांपैकी पहिल्या टप्प्यातील ६५ कामांना मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मंजुरी देण्यात आली.

यावेळी ते बोलत होते.सह्याद्री अतिथीगृह येथे पार पडलेल्या या बैठकीला सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले (व्हीसीद्वारे), राज्यमंत्री इंद्रनील नाईक आणि आमदार प्रसाद लाड उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यांवर रेल्वे उड्डाण पूल, पादचारी पूल आणि रेल्वे मार्गाखालील (अंडर पास) रस्ते महारेलमार्फत बांधले जाणार आहेत. याबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, पहिल्या टप्प्यात मान्यता दिलेल्या ६५ कामांपैकी ज्या रस्त्यांवर २५ हजार ते १ लाखापर्यंत 'टीव्हीयू' (ट्रेन व्हेईकल युनिट - वाहनांची वर्दळ) आहे आणि जिथे कमीत कमी भूसंपादन आवश्यक आहे, अशी कामे प्राधान्याने हाती घेऊन ती तातडीने पूर्ण करावीत. महानगरांमध्ये रेल्वे मार्गांच्या आजूबाजूला वेगाने होणारे शहरीकरण लक्षात घेऊन नागरिकांच्या सुलभ दळणवळणासाठी या पायाभूत सुविधा मैलाचा दगड ठरतील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.वाढत्या शहरीकरणाचा विचार करता राज्यातील विविध शहरांमध्ये एकूण ८० रेल्वे पायाभूत सुविधांची कामे नियोजित करण्यात आली आहेत.

यामध्ये सर्वाधिक मुंबई महानगर क्षेत्रात १७, पुणे शहरात १५, नागपूर १३, नाशिक व अमरावती प्रत्येकी ५, सांगली ४, तर छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, धुळे, लातूर व परभणी येथे प्रत्येकी ३ कामे होणार आहेत. याशिवाय सोलापूर आणि जळगावमध्ये प्रत्येकी २, तर अहिल्यानगर व नांदेड शहरात प्रत्येकी १ काम केले जाईल. या शहरांमधील कामांच्या पडताळणीसाठी संबंधित महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांची संयुक्त समिती स्थापन करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. ही समिती पडताळणी करून अहवाल दिल्यानंतर महारेल प्रत्यक्ष काम सुरू करेल. नागपूर शहरात उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलांवर भविष्यातील वाहनांची वाढती संख्या पाहता चौकांमध्ये वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे,

त्यामुळे तिथे आतापासूनच कोंडी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. तसेच, अमरावती-बडनेरा मार्गावरील जुना झालेला रेल्वे उड्डाणपूल पाडून त्याठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानाचा नवीन पूल उभारण्याचे आदेश त्यांनी दिले.

## फिलीपिन्समध्ये ७.७ रिश्टर स्केलचा भूकंप




वृत्तसंस्था

फिलीपिन्स : फिलीपिन्समध्ये सोमवारी, सकाळी झालेल्या एका शक्तिशाली आणि थरारक भूकंपाने संपूर्ण देशाला हादरवून सोडले आहे. रिश्टर स्केलवर ७.७ इतक्या तीव्रतेच्या या भूकंपाने मोठ्या प्रमाणावर हाहाकार माजवला असून, यात किमान ३ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. यावेळी एका प्राथमिक शाळेतील अंगावर काटा आणणारा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून, यामुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे.

दरम्यान, फिलीपिन्समधील दाव्हओ ऑक्सिडेंटल येथील महायाहाय एलिमेंटरी स्कूलमधील आहे. धक्कादायक बाब म्हणजे, विद्यार्थ्यांच्या शाळेचा हा पहिलाच दिवस होता. भूकंपाच्या तीव्र धक्क्यांमुळे शाळेतील लहान मुले भीतीने ओरडत होती आणि रडत होती. जमीन हादरत असताना शिक्षक मुलांना धीर देत इमारतींपासून दूर मोकळ्या मैदानात सुरक्षितपणे नेण्याचा प्रयत्न करत होते. फ्लॅग सेरेमनी सुरू असतानाच, शाळेच्या छताचा एक भाग कोसळला. सुदैवाने शिक्षकांच्या सतर्कतेमुळे आणि मुलांना दिलेल्या भूकंप आपात्कालीन प्राथमिक प्रशिक्षणामुळे सर्व विद्यार्थी आणि शिक्षकही सुरक्षित आहेत.

नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीनुसार, या भूकंपाचे केंद्र जमिनीखाली तब्बल ९३ किलोमीटर खोलीवर होते. या खोलीमुळे याला इंटरमीडिएट फोकस भूकंप म्हटले जात आहे. भूकंपावर फिलीपिन्समध्ये त्सुनामीचा हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. समुद्राच्या पातळीत सातत्याने बदल होत असून, मुख्य धक्क्यानंतरही काही सेंटीमीटर उंचीच्या त्सुनामी लाटांची नोंद झाली आहे. आंतरराष्ट्रीय माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य भूकंपानंतर तब्बल १३८ धक्के जाणवले असून, त्यांची तीव्रता १.३ ते ६.७ रिश्टर स्केल एवढी नोंदवली गेली आहे.

तसेच स्थानिक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या भूकंपामुळे ३७ मोठ्या व्यावसायिक इमारतींचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक घरांना तडे गेले असून नागरिक रस्ते, कार्यालये आणि शाळांमधून जीव वाचवण्यासाठी बाहेर धावत होते. काही ठिकाणी इतर शाळांमध्ये इजा झाल्याचे किंवा विद्यार्थी अडकल्याच्या बातम्या आहेत. यावेळी वेळ न दवडता आपत्कालीन पथके बाधित भागात तैनात करण्यात आली असून, ढिगारे उपसण्याचे आणि नागरिकांना सुरक्षित स्थळी नेण्याचे काम सुरू आहे. प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि कोसळलेल्या इमारतींमध्ये न जाण्याचे आवाहन केले आहे.

## सर्वच ठिकाणचा हलाल बंद झाला पाहिजे

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा सहकारी दुग्ध संघ अर्थात गोकुळने हलाल प्रमाणपत्र घेतल्याच्या बातमीवरुन हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ता रमेश शिंदे यांनी तीव्र आवाज उठवला आहे. ते म्हणालेत की, हलाल म्हणजे हिंदूंसाठी 'जिझिया' कर; हलाल प्रमाणपत्राच्या पैशाचा उपयोग मुस्लिम संस्थांकडून आतंकवाद्यांना कायदेशीर मदत करण्यासाठी होत असल्याचे आरोप त्यांनी केले. कोल्हापुरात हिंदू जनजागृती समितीकडून आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी जमीयत उलेमा ए हिंदसारख्या संस्थांवरून हे पैसे गोळा केले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. धर्मावर आधारित हलाल प्रमाणपत्र देणे लगेच बंद करावे, अशी मागणी यावेळी रमेश शिंदे यांनी केली आहे. त्यांनी म्हटले की, 'महाराष्ट्रात दूध मागणीपेक्षा कमी पुरवठा होत असतानाही परदेशासाठी हलाल प्रमाणित उत्पादन पाठवून स्थानिक गरज का दुर्लक्षित केली जात आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

## २१ जागांसाठी तब्बल २१४ अर्ज

छ.संभाजीनगर : राजकीयदृष्ट्या अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचा थरार आता खऱ्या अर्थाने सुरू झाला आहे. बँकेच्या एकूण २१ संचालक पदांसाठी तब्बल २१४ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. जिल्ह्यातील सर्वपक्षीय मातब्बर आणि दिग्गज नेत्यांनी या निवडणुकीत उडी घेतल्यामुळे, आज (सोमवारी) होणाऱ्या अर्ज छाननीकडे संपूर्ण जिल्ह्याचे आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## अटल सेतूवरून २८ वर्षीय तरुणाची समुद्रात उडी

नवी दिल्ली : अटल सेतू पुलावरून एका २८ वर्षीय तरुणाने समुद्रात उडी मारल्याची धक्कादायक घटना रविवारी पहाटे घडली. या घटनेनंतर पोलिसांनी आणि संबंधित बचाव यंत्रणांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली असून, सोमवारी सायंकाळपर्यंत तरुणाचा कोणताही ठावठिकाणा लागलेला नव्हता.

## दादरमध्ये भीषण अपघात

मुंबई : मुंबईत बेस्ट बसचा पुन्हा एक अपघात झाला आहे. दादरमधील प्लाझा सिनेमाजवळ असलेल्या कोतवाल उद्यानाजवळ ही घटना घडली. बेस्ट बस आणि टॅक्सी कारची धडक झाली. या त्यानंतर बसची एका दुचाकीलाही धडक बसली. या अपघातात काही जण जखमी झाले आहेत. सकाळी घडलेल्या अपघातामुळे वाहतुकीचा वेग मंदावला होता.

## भर मुलाखतीतून ट्रम्प उठून गेले !

वॉशिंग्टन : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि तिथल्या प्रसारमाध्यमांमध्ये असलेला वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. सध्या अमेरिकेत निवडणुकींचे वारे वाहत आहेत. कॅलिफोर्नियातील निवडणूक गैरव्यवहार आणि २०२० च्या राष्ट्राध्यक्ष निवडणुकीबाबत विचारलेल्या टीकात्मक प्रश्नांमुळे ट्रम्प भर मुलाखतीतून तडका फडकी उठून निघून गेले. एनबीसी वाहिनीच्या मी द प्रेस या प्रसिद्ध कार्यक्रमासाठी ज्येष्ठ पत्रकार क्रिस्टन वेल्कर या ट्रम्प यांची मुलाखत घेत असतानाच, वाद वाढल्याने ट्रम्प यांनी वेल्कर आणि एनबीसी वाहिनीला जाहीरपणे भ्रष्ट म्हणत मुलाखत मध्येच थांबवली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात, दोघांचा मृत्यू तर पाच जण गंभीर जखमी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर लासूर स्टेशनजवळील डोणगाव परिसरात झालेल्या भीषण अपघातात एका महिला आणि अल्पवयीन मुलीचा जीव गेला, तर पाच जण गंभीर जखमी झाले. मुंबईहून अमरावतीकडे जाणाऱ्या कुटुंबाच्या कारचे टायर अचानक फुटल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. भरधाव कार सुरक्षा कठडा तोडून सुमारे २० फूट खोल पुलाखाली कोसळली. या दुर्घटनेत हुमेरा मोहसिन शेख आणि हरिम जुनेद अहमद यांचा जागीच जीव गेला. अपघाताची माहिती मिळताच पोलिस व महामार्ग सुरक्षा पथक घटनास्थळी दाखल झाले. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## धाराशिवला गतिमान ठेवण्याचे कार्य

**धाराशिव :** फॉर्च्यून ग्लोबल ५०० कंपनी आणि महारत्न पीएसयू असलेली भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल) आपल्या मजबूत पुरवठा आणि वितरण नेटवर्कच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यात अखंड इंधन उपलब्धता सुनिश्चित करत आहे. गेल्या काही आठवड्यांमध्ये धाराशिवमधील बीपीसीएलच्या रिटेल नेटवर्कमध्ये इंधनाच्या मागणीत लक्षणीय वाढ झाली आहे. मे २०२६ मध्ये पेट्रोल विक्री १,८२८.१४ मेट्रिक टनांवर पोहोचली असून, मे २०२५ मधील १,६२८.२८ मेट्रिक टनांच्या तुलनेत ही वाढ १२.२७ टक्के आहे. त्याचप्रमाणे, मे २०२६ मध्ये डिझेल विक्री ६,७१८.६० मेट्रिक टनांवर पोहोचली असून, मे २०२५ मधील ४,७२६.०३ मेट्रिक टनांच्या तुलनेत ४२.१६ टक्क्यांची भक्कम वाढ नोंदविण्यात आली आहे.

## स्विचगिअर निर्मिती प्रकल्पाच्या कामकाजास सुरुवात

**मुंबई:** इंजिनीअरिंग क्षेत्रातील एक प्रमुख समूह आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग उद्योगातील अग्रेसर कंपनी असलेल्या सीजी पॉवर अँड इंडस्ट्रियल सोल्युशन्स लिमिटेडने नाशिक, महाराष्ट्र येथील पिंपळगाव गरुडेश्वर येथे आपल्या 'एक्स्ट्रा हाय-व्होल्टेज' (ईएचव्ही) स्विचगिअर उत्पादन प्रकल्पाचे (एस३ युनिट-II) कामकाज सुरू केल्याची घोषणा आज केली. नाशिकमधील अंबड येथील 'एस३ युनिट-I' या उत्पादन प्रकल्पाव्यतिरिक्त हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे; या 'एस३ युनिट-I' मध्ये ३३ केव्ही (केव्ही) ते ८०० केव्ही (केव्ही) क्षमतेच्या ईएचव्ही सर्किट ब्रेकर्सचे उत्पादन केले जाते.

## पर्यावरण विषयक बांधिलकी अधिक मजबूत

**छत्रपती संभाजीनगर:** जागतिक पर्यावरण दिन २०२६ निमित्त कॉस्मो फर्स्ट लिमिटेडची समाज विकास शाखा असलेल्या कॉस्मो फाउंडेशनने दिल्ली, गुजरात आणि महाराष्ट्र येथे कर्मचारी सहभागाच्या विविध उपक्रमांद्वारे हा दिवस साजरा केला. गुजरातमधील कर्जन येथे कर्मचारी शाश्वत पर्यावरण विषयक पद्धतींची शपथ घेण्यासाठी आणि वृक्षारोपण मोहिमेत सहभागी होण्यासाठी एकत्र आले. या आयोजित उपक्रमांचा भाग म्हणून कॉस्मो फाउंडेशनने प्रयास यूथ फाउंडेशनच्या सहकार्याने दिल्ली येथे सीड बॉल मेकिंग कार्यशाळेचे आयोजन केले तसेच महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथील आर्मी कँटोनमेंट जैवविविधता केंद्रात वृक्षारोपण मोहीम राबवली. यावेळी कर्मचाऱ्यांनी १०० रोपांची लागवड करून दीर्घकालीन हरितीकरणाच्या प्रयत्नांना हातभार लावला. कॉस्मो फाउंडेशनच्या मोठ्या प्रमाणावरील वृक्षारोपण कार्यक्रमांच्या जोडीला जागतिक पर्यावरण दिनाच्या निमिताने हे उपक्रम राबविण्यात आले.

## ब्रेन ट्यूमर वर अत्याधुनिक उपचार उपलब्ध - डॉ मिलिंद दुनाखे

छत्रपती संभाजीनगर - ब्रेन ट्यूमर म्हणताच सर्वसामान्यांच्या पोटात गोळा येतो .ब्रेन ट्यूमर झाल्यास रुग्ण व नातेवाईक बऱ्याचदा घाबरून जातात परंतु, आधुनिक उपचार पद्धतीने यावर मात करता येते. असे डॉ मिलिंद दुनाखे , मेंदू विकर तज्ज्ञ, मेडिकोवर हॉस्पिटल यांनी सांगितले. लक्षणे खालील प्रमाणे आहे तीव्र डोकेदुखी, मळमळ ,उलटी होणे, चक्कर येणे फिट येणे, एक बाजू कमजोर पडणे किंवा रुग्णाच्या वर्तणुकीत बदल होणे , स्मरणशक्ती कमी होणे नजर कमी होणे कमी ऐकू येणे यासारखी लक्षणे दिसून येतात. ही लक्षणे मेंदूतील वेगवेगळ्या भागातील गाठी मुळे दिसतात जसे की संप्रेरकाचे काम कमी जास्त होणे हे पण एक ब्रेन टुमारचे लक्षण आहे. सर्वसाधारणपणे सुरळीत चालू असलेला शरीर प्रक्रियेतील काही बदल जाणवल्यास ब्रेन ट्युमर ची शंका घेतली जाऊ शकते. त्यासाठी करावयाच्या तपासन्या म्हणजे सिटी ब्रेन ,एम आर आय ह्या तपासण्या द्वारे निदान केली जाऊ शकते.

## ३.२६ लाख एकर क्षेत्र झाले पराली जाळण्या पासून मुक्त

मुंबई- जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने एचडीएफसी बँकेने त्यांच्या परिवर्तन उपक्रमाचा एक भाग म्हणून सीआयआय फाऊन्डेशनच्या सहकार्याने क्रॉप रेसिड्यू मॅनेजमेंट (सीआएम) उपक्रमा अंतर्गत एक महत्त्वपूर्ण टप्पा पार केला असून या अंतर्गत २०२५ च्या मौसमात पंजाब आणि हरियाणातील ८८ टक्के म्हणजेच ३,७८,४२५ एकर क्षेत्राला पराली जाळण्यापासून वाचवण्यात यश मिळाले आहे. लुधियाना आणि संगरुर जिल्ह्यात असलेल्या ३८० गावांमधील ८६,००० शेतकऱ्यां पर्यंत पोहोचून या कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्वसमावेशक आणि निष्कर्श दिसून येणाऱ्या प्रयत्नांच्या माध्यमातून उत्तर भारतातील कृषी क्षेत्रामुळे होणाऱ्या हवेच्या प्रदुषणावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## टोयोटा ने सादर केली नवी इनोव्हा क्रिस्टा

**बेंगळुरू, ०५ जून २०२६:** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय एमपीवी नवी इनोव्हा क्रिस्टा लॉन्च करण्याची घोषणा केली. नव्या बोल्ड डिझाइन एलिमेंट्स आणि अतिरिक्त सोयीसुविधांसह ही गाडी ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. टोयोटाची “एव्हर बेटर कार्स” फिलॉसफी आणि मजबूत कस्टमर-फर्स्ट अप्रोच यानुसार, हे नवीन अपग्रेड बदलत्या ग्राहक गरजा लक्षात घेऊन काळजीपूर्वक तयार करण्यात आले आहे. त्यामुळे लाखो भारतीय कुटुंबांसाठी विश्वासार्ह मोबिलिटी पार्टनर म्हणून इनोव्हा क्रिस्टाचा वारसा अधिक मजबूत होणार आहे.

## ॲनिमे इंडिया 2026 साठी भागीदारी

**नवी दिल्ली, 05 जून 2026:** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज देशभरातील विविध शहरांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या ॲनिमे इंडिया 2026 मालिकेसाठी ॲनिमेशन एक्सप्रेससोबत भागीदारीची घोषणा केली. या सहकार्याद्वारे टीकेएम चे उद्दिष्ट जनरेशन झेड आणि युवा मिलेनियल प्रेक्षकांशी अधिक प्रभावी संवाद साधणे तसेच सर्व वयोगटांतील ग्राहकांमध्ये ब्रँडबद्दलची आत्मीयता अधिक दृढ करणे आहे.

## फुल दिले की फुलच मिळते

छत्रपती संभाजीनगर - खानापूर आटपाडीचे आमदार सुहास बाबर म्हणजे पिंपळाच्या झाडासारखा सळसळता उत्साह आहे. त्याला वाढविण्याची, जपण्याची आणि पाणी घालण्याची जबाबदारी तुमची-आमची आहे,” अशा हृदयस्पर्शी शब्दांत ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ यांनी शिवसेनेचे आमदार सुहास बाबर यांच्या कार्याचे कौतुक करत ट्री आर्मीच्या वृक्षलागवड चळवळीला भक्कम पाठिंबा दिला. गार्डी-घानवडच्या माळावर ट्री आर्मी आणि जेके फाउंडेशनच्या माध्यमातून साडेचार हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी जॅकी श्रॉफ यांच्या हस्ते या लोकचळवळीचा औपचारिक शुभारंभ झाला.

# जलसमाधी आंदोलन करून प्रशासनाचा निषेध
# घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू संशयास्पद

तभा वृत्तसेवा



**पैठण दि ०८ :** घरकुल योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना शासनाकडून मोफत वाळू उपलब्ध करून देण्याची तरतूद असताना प्रत्यक्षात हजारो गरीब लाभार्थी वाळूपासून वंचित राहिल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. प्रशासनाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार पैठण तालुक्यात एकूण 15,296 घरकुल लाभार्थी असताना केवळ 131 लाभार्थ्यांनाच वाळूचा लाभ मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.

या धक्कादायक आकडेवारीमुळे उर्वरित हजारो लाभार्थ्यांच्या नावावरील वाळू नेमकी कुठे गेली, कोणाला वितरित करण्यात आली आणि शासनाच्या योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत का पोहोचला नाही, असे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

या प्रश्नांची उत्तरे मिळावीत, घरकुल लाभार्थ्यांना न्याय मिळावा आणि वाळू वितरणातील कथित गैरव्यवहाराची निष्पक्ष चौकशी व्हावी या मागण्यांसाठी आज सकाळी 11 वाजता पाटेगाव पुल, पैठण येथे सर्वसामाजिक संघटनांच्या वतीने जलसमाधी आंदोलन करण्यात आले आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून घरकुल लाभार्थी तहसील कार्यालय, वाळू डेपो आणि संबंधित शासकीय कार्यालयांच्या चकरा मारत आहेत. अनेक लाभार्थ्यांनी घरकुल मंजूर होऊनही वाळू उपलब्ध नसल्यामुळे बांधकाम रखडल्याची तक्रार केली आहे. दुसरीकडे दररोज मोठ्या प्रमाणात वाळू उपसा आणि वाहतूक होत असल्याचे चित्र सर्वसामान्य नागरिकांनी पाहिले आहे. त्यामुळे घरकुल लाभार्थ्यांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा संशय अधिक बळावला आहे.

आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, शासनाची योजना ही गरीब आणि गरजू कुटुंबांसाठी आहे. मात्र प्रत्यक्षात गरीबांना त्यांच्या हक्काची वाळू मिळत नसल्याने शासनाच्या उद्दिष्टालाच हरताळ फासला गेला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे.

**आंदोलनाच्या प्रमुख मागण्या :** 1. पैठण तालुक्यातील सर्व पात्र घरकुल लाभार्थ्यांना तात्काळ मोफत वाळू उपलब्ध करून द्यावी. 2. घरकुल लाभार्थ्यांच्या नावाने वितरित करण्यात आलेल्या वाळूची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करावी. 3. वाळू वितरण प्रक्रियेत GPS ट्रॅकिंग, CCTV देखरेख आणि ऑनलाइन नोंदणी प्रणाली लागू करून संपूर्ण पारदर्शकता आणावी. 4. अवैध वाळू उत्खनन, वाहतूक आणि काळाबाजार करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. 5. संबंधित अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार अथवा इतर कोणाचाही सहभाग आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. 6. महसूल, पोलीस आणि खनिकर्म विभागाच्या संयुक्त पथकाद्वारे नियमित तपासणी मोहीम राबवावी.

आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, गरीबांच्या घरकुलाचा हक्क कोणत्याही परिस्थितीत हिरावून घेतला जाऊ देणार नाही. प्रशासनाने तातडीने योग्य निर्णय घेऊन घरकुल लाभार्थ्यांना न्याय दिला नाही तर आगामी काळात आंदोलनाची तीव्रता वाढविण्यात येईल अशी माहिती राऊत यांनी दिली.

"घरकुल आमचा हक्क आहे, भीक नाही!"

"गरीबांच्या हक्काची वाळू गरीबांनाच मिळाली पाहिजे!"

"वाळू माफियांना संरक्षण नव्हे, कारवाई झाली पाहिजे!" अश्या घोषणा यावेळी देण्यात आल्या. आंदोलक अनिल राऊत,किशोर शिरवत, अतिश गायकवाड, साईनाथ कर्डिले, चंद्रकांत झारगड, सुभाष नवथर,रामेश्वर बावणे, भगवान सोरमारे, विशाल काळे, शिवाजी साबळे, गणेश औटे, कृष्णा काळे, अभिषेक मोरे,आदी यावेळी उपस्थित होते.

# 'हरित महाराष्ट्र'साठी जिल्ह्यात वृक्ष लागवड उद्दिष्टपूर्तीचे नियोजन करा- जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी

### जिल्ह्यातील २१,९४० हेक्टरवर २कोटी ४४लाख वृक्षारोपण

**छत्रपती संभाजीनगर :** 'ग्रीन महाराष्ट्र मिशन' (हरित महाराष्ट्र) अंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा हरित चेहरा बदलण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आगामी १० वर्षांत जिल्ह्यातील शासकीय पोटखराब २१,९४० हेक्टर क्षेत्रावर वृक्षारोपण करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे .विविध विभागांच्या समन्वयातून हे काम पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांनी सामाजिक वनीकरण विभागास दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित हरित आयोगाच्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी वृक्ष लागवडीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नू पी. एम, प्रादेशिक वन अधिकारी सुवर्णा माने, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके,सामाजिक वनीकरण विभागीय वन अधिकारी संदीप गिरी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, रोहयो विभागाचे उपजिल्हाधिकारी रुपेश शिंगारे, यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गौडा म्हणाले की, वृक्षारोपणासाठी केवळ वनविभागाच्या जमिनीवर अवलंबून न राहता, शासकीय पडीक ,पोटखराब जमीन, खाजगी कमी दर्जाची जमीन, जलसंपदा विभागाचे क्षेत्र, उद्योग विभाग, कृषी विभाग आणि महानगरपालिका यांच्या अखत्यारितील मोकळ्या जागांचा वापर करण्यात येणार आहे. जमिनीच्या उपलब्धतेनुसार क्षेत्रनिश्चित केले जाईल.याचे नियोजन वन विभाग आणि संबंधित यंत्रणेला करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी गौडा यांनी दिले.सामाजिक वनीकरण, कृषी आणि वनविभागाच्या नर्सरीमधून दर्जेदार रोपांचा पुरवठा केला जाणार आहे.वृक्षारोपणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जलसंधारण, रोजगार हमी योजना, ग्रामपंचायत आणि जिल्हा रेशीम कार्यालय यांच्याशी समन्वय राखून काम करण्याचे निर्देश देण्यात आले.

संबंधित विभागाने वृक्ष लागवडीसाठी योग्य जागांचे तातडीने नियोजन करावे, जेणेकरून पावसाळ्याच्या काळात लागवडीचे काम गतीने पूर्ण होईल. यावर्षी पावसाचे पाणी कमी असणार आहे . याचा नियोजनात विचार करुन अधिकचे उद्दिष्ट पुढील काही वर्षात नियोजित करावे. जेणेकरून वृक्ष जतन करण्यासाठी उपयोग होईल.

हरित महाराष्ट्र मिशन' हे केवळ वृक्षारोपणापुरते मर्यादित नसून, पर्यावरणाचा समतोल राखणे आणि भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवणे हे याचे मुख्य ध्येय आहे. १० वर्षांचा कालावधी असल्याने, लागवड केलेल्या रोपांचे संवर्धन , जतन करण्याची जबाबदारीही संबंधित विभागांवर सोपवण्यात आली आहे. या मोहिमेमुळे जिल्ह्यातील हरित पट्ट्यात मोठी भर पडणार असून, निसर्गाचा समतोल राखण्यास मदत होणार आहे.या मोहिमेच्या यशस्वीतेसाठी नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि ग्रामपंचायतींनी पुढाकार घेऊन जास्तीत जास्त वृक्ष लागवड आणि संगोपनात सहभागी होणे आवश्यक आहे.

वनराई बंधारे' निर्मिती करण्यात पुढाकार घ्यावा

वृक्षारोपणासोबतच ती जगविण्यासाठी जलसंधारणावर भर देण्यास जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी विशेष सूचना दिल्या .यात ऑक्टोबर महिन्याच्या अखेरीस विविध विभागांच्या आणि सामाजिक संस्थांच्या मदतीने 'वनराई बंधाऱ्यांची' निर्मिती आणि दुरुस्ती करण्याचे नियोजन करण्याचे निर्देश दिले.वनराई बंधारे बांधण्यात लोकसहभाग आणि श्रमदानातून करण्यावर प्रशासनाचा भर असेल. यासाठी

कृषी विभागाने जलसंधारण विभागाच्या मदतीने बंधाऱ्यांसाठी जागा निवडणे, त्यांचे तांत्रिक नियोजन करणे आणि आवश्यक प्रशिक्षण देण्याचे काम करावे.

## क्षेत्र वेरुळ येथील मालोजीराजे भोसले गढी च्या सर्वंगणी विकासासाठी निधी उपलब्ध करून द्या

### देण्यासाठी मुख्यमंत्री महोदयाकडे बैठक लावा राजेंद्र पवार यांची मंत्रिमहोदयाकडे मागणी



**खुलताबाद प्रतिनिधी :** श्री क्षेत्र वेरूळ येथील शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी आलेल्या मान्यवरांकडे प्रामुख्याने राजेंद्र पवार यांच्या वतीने घडीच्या सर्वांगीण विकासासाठी आलेल्या मंत्री महोदयासह सर्व प्रमुख मान्यवरांना लेखी स्वरुपात निवेदन देऊन उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्याचे ओबीसी कल्याण मंत्री अतुल मोरेश्वर सावे जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे खासदार संदिपान भुमरे जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील संभाजीनगर शहराचे महापौर समीर राजूरकर जिल्हा परिषद सदस्य कुणाल दांडगे छत्रपती संभाजी नगर भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे सरपंच प्रकाश पाटील मिसाळ यांची उपस्थिती होती

महाराष्ट्रातील सर्व शिवभक्ताच्या वतीने स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी लिखित स्वरूपामध्ये निवेदन दिले आहे की या ऐतिहासिक जागेचा विकास होण्यासाठी मुख्यमंत्री महोदय कडे बैठक लावावी मालोजीराजे भोसले गडीच्या संदर्भात चार प्रमुख मागण्या यावेळी केले असून या जागेचं महत्त्व फक्त स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची जन्मभूमी असल्यामुळे पितृ तीर्थ म्हणून या घडीला घोषित करावे दुसरी मागणी जागतिक दर्जाचे स्मारक होण्यासाठी ४०० ते ५०० कोटी रुपये तरतूद करून या पवित्र पावन भूमीचा विकास करावा तिसरी प्रमुख मागणी सोलापूर धुळे राष्ट्रीय महामार्गाला स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले महामार्ग असे नाव देण्यात यावे कारण याच मार्गाने शहाजीराजे भोसले कर्नाटक येथे गेले असून त्यांची समाधी उदगिरी कर्नाटक येथे आहे चौथी मागणी वेरूळ येथील मुख्य चौक मालोजीराजे भोसले यांच्या नावाने असून कुंभमेळा च्या अगोदर या चौकाचे शुभिकरण होणे गरजेचे आहे कारण भारतभरातून कुंभमेळ्याच्या पर्वकाळावर करोडो लोक वेगवेगळ्या शहरातून येतील त्यांच्यापर्यंत हा इतिहास योग्य पद्धतीने जाईल या सर्व बाबींचा विचार करून मागण्या मंत्री अतुल मोरेश्वर सावे व पालकमंत्री संजयजी शिरसाट यांच्याकडे केल्या असून दोन्ही मान्यवरांनी या संदर्भात लवकरच मुख्यमंत्री महोदयांची बैठक लावून असे आश्वासन हजारो शिवभक्तांना शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने शुभेच्छा पर भाषणामध्ये आश्वासित केले. प्रतिष्ठानच्या वतीने विविध उपक्रम स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांच्या चरणापाशी वर्षभरात राबवली जातात अध्यक्ष राजेंद्र पवार यांच्यावतीने राबवले जातात याबद्दल राज्याचे ओबीसी कल्याण मंत्री अतुल मोरेश्वर सावे पालकमंत्री संजयजी शिरसाठ खासदार संदिपान भुमरे पाटील यांनी विशेष अभिनंदन केले

## छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात स्वच्छता मोहिम



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हाधिकारी आणि सर्वच वरिष्ठ अधिकारी झाडू, फावडे, टोपल्या घेऊन मैदानात उतरले आणि अवघ्या दोन तासाच्या श्रमदानातून जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर हा हा म्हणता स्वच्छ झाला. यानिमित्ताने पुन्हा एकदा समुह शक्तीचा प्रत्यय जिल्हा प्रशासनाने आणून दिला. सकाळी ७ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात कर्मचारी अधिकारी जमा होऊ लागले. स्वच्छता मोहिम राबवून कार्यालय परिसर स्वच्छ करण्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यास प्रतिसाद देत सर्व अधिकारी कआणि र्मचारी सहभागी झाले.

स्वतः जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. हातात झाडू घेऊन पुढे सरसावले. सर्व आवारात अधिकारी- कर्मचाऱ्यांनी गटागटाने भाग स्वच्छ करायला घेतला. वाढलेली झुडपे, गवत, जमा झालेला पाला पाचोळा, फेकलेल्या वस्तू, पाण्याच्या बाटल्या, निरुपयोगी साहित्य अशा एक ना अनेक जमा झालेल्या वस्तू काना-कोपऱ्यातून निघाल्या. हळू हळू प्रत्येक कोपऱ्यात कचऱ्याचे संकलन झाले. मग महापालिकेचे कचरा वाहतुक करणारी वाहने जमा झाली. एक दोन नव्हे तब्बल १२ वाहने भरुन कचरा जमा झाला. एकाच दिवसातल्या अवघ्या दोन तासाच्या श्रमदानाने चकाचक झालेले जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवार पाहून सारे अधिकारी- कर्मचारी स्वतःच आश्चर्य व्यक्त करीत होते. या मोहिमेत निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी (सामान्य शाखा) संगिता राठोड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर,उपजिल्हाधिकारी रुपेश सिंगारे, डॉ. निलेश अपार, एकनाथ बंगाळे, जिल्हा खनिकर्म अधिकारी दिनेश झांपले, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक माहिती व तंत्रज्ञान विभाग शरद दिवेकर तसेच सर्व विभागप्रमुख, कर्मचारी आदी या मोहिमेत सहभागी झाले.

## सोयगाव शिवारात वादळाचा तडाखा;-शेतातील खोल्यांचे पत्रे हवेत



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.८ जून :** सोयगाव सह शिवारात शनिवारी रात्री सात वाजेच्या सुमारास झालेल्या वादळी वाऱ्याने शेतकऱ्यांच्या शेतातील दोन खोल्या वरील पत्रे हवेत उडून नुकसान झाले आहे. दरम्यान शनिवारी रात्री सात वाजेनंतर वादळी वाऱ्याने तासभर तडाखा दिला यामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.सोयगाव शिवारात मयुर सुरेश मनगटे यांच्या गट क्र. १७२ मध्ये असलेल्या दोन खोल्या वरील पत्रे वादळाने उडून खोल्या च्या भिंती ढासळून नुकसान झाले आहे.दरम्यान सोयगाव शिवारात झालेल्या वादळी वाऱ्याने अनेक शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे महसूल विभागाने या नुकसानीचे पंचनामे करण्यात यावे व या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी होत आहे.

## अपघातविरहित सेवेसाठी चालक इरफान तडवी यांचा सन्मान



तभा.वृत्तसेवा

**सोयगाव, दि.८ जून :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने सोयगाव आगारातील चालक इरफान इस्माईल तडवी बिल्ला क्र.१९७०० यांचा अपघातविरहित सेवेसाठी सन्मान करण्यात आला. तब्बल २६ वर्षांहून अधिक काळ सुरक्षित व शिस्तबद्ध सेवा बजावत प्रवाशांमध्ये विश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण केल्याबद्दल त्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत सोयगाव आगारात कार्यरत असलेल्या तडवी यांनी आपल्या सेवाकाळात उत्कृष्ट कर्तव्यदक्षता,वाहतूक नियमांचे काटेकोर पालन आणि सुरक्षित वाहनचालनाचा आदर्श ठेवला आहे.त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने त्यांना सन्मानपत्र व २५००० रु चा चेक देऊन गौरविले.या सन्मानामुळे सोयगाव आगारातील अधिकारी,कर्मचारी तसेच प्रवासी वर्गातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## २६ बालकाची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधी वाटप




तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.८ जून :** तालुक्यातील दुर्गम भागातील रामपूर वाडी,न्हावी तांडा, निंबायती,पिंपरी,रामपूर तांडा येथील अंगणवाडी तील बालकाची आरोग्य तपासणी करून यातील २६ बालकांना मोफत औषधी वाटप करण्यात आली.

प्रकल्प कार्यालय व राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या आरोग्य तपासणी शिबिरात. पाच गावांतील अंगणवाडीतील बालकाची आरोग्य तपासणी करण्यात आली.या उपक्रमाचे संयोजक संजय शहापूरकर यांनी सांगितले की कुपोषण कमी करण्यासाठी अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन चे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी हा उपक्रम सुरू केला असून्य बालकांना मोफत औषधी वाटप करण्यात येते.

आज वैद्यकीय अधिकारी डॉ.खालिद झाकी व डॉ.पठाण यांनी बालकाची आरोग्य तपासणी केली.याप्रसंगी अंगणवाडी सेविका नंदाबाई दांडगे,वंदनाबाई चव्हाण, रंजना जाधव,मीरा मोरे यांच्यासह मदतनीस उपस्थित होते.

## माझं गाव आरोग्य संपन्न गाव अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांची मुर्शीदाबाद वाडी येथे भेट



**छत्रपती संभाजीनगर, 08 जून :** मौजे मुर्शीदाबाद वाडी ता. फुलंब्री येथे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. "माझं गाव – आरोग्य संपन्न गाव" या अभियानाचा आढावा घेण्यात आला. तसेच जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंखे, उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, तहसीलदार योगिता खटावकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. निरोगी पर्यावरणासाठी वृक्षारोपण आणि संवर्धन ही काळाची गरज आहे. चला, हरित व आरोग्यसंपन्न गाव घडविण्यासाठी एकत्र येऊया, असा संदेश जिल्हाधिकारी गौडा यांनी ग्रामस्थांशी बोलतांना दिला.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## प्रवेश नोंदणीसाठी आज शेवटचा दिवस

तभा वृत्तसेवा

लातूर : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. आज अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेत नोंदणी केली आहे.

दि. ६ जून रोजी पासून नियमित दुसऱ्या फेरीतील विद्यार्थी नोंदणी सुरु झाली आहे. यामध्ये विद्यार्थी नविन नोंदणी, प्रवेश अर्जाचा भाग-१ मधील दुरुस्ती आणि भाग-२ (कनिष्ठ महाविद्यालय पसंतीक्रम) आज दि. ९ जून रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत भरु शकतात. या फेरीमध्ये सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश अर्ज अनलॉक करण्यात आल्याने सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रवेश अर्ज लॉक करणे अनिवार्य आहे.



## विविध वृत्त...

### महावितरणचा २१ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ जून : अनावश्यक खर्च टाळून अत्यंत साधेपणाने व मोठ्या उत्सहात महावितरणचा २१ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. महावितरणचे वीजग्राहक, कर्मचारी यांच्यामध्ये विद्युत अपघाता बाबत साक्षरता निर्माण व्हावी या उद्देशाने सुरक्षा रॅलीचे व आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

विद्युत भवनातील लघु प्रशिक्षण सभागृहात कार्यकारी अभियंता अनिरूद्ध घाटगे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं) चेतन वाघ, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर, उपकार्यकारी अभियंता प्रमोद दुधाळे, सहाय्यक अभियंता सुदर्शन बोळेगावे, शिलरत्न सुर्यवंशी, राहूल गाडे, श्री सुळ, तसेच आरोग्य शिबीराचे आयोजक आयकॉन हॉस्पीटलचे डॉ. अजनीकर यांच्या प्रमूख उपस्थितीत पार पडलेला २१ वा वर्धापन दिन दि. ६ जून रोजी उत्सहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी लातूर परिमंडळाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी व जनमित्रांना सुरक्षा शपथ देत महिनाभर साजरा होणाऱ्या विद्युत सुरक्षा जागर कर्यक्रमाची सुरवात केली. प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी महेंद्र चुनारकर यांनी केले तर सुत्रसंचालन उपव्यवस्थापक अजीत जैन यांनी केले. कार्यक्रम यशश्र्वीतेसाठी अमीत नाचणे, अश्रिवन गायकवाड यांच्यासह परिमंडळ, अधिकारी, कर्मचारी व जनमित्रांनी विशेष परिश्रम घेतले.

### इसम बेपत्ता



तभा वृतसेवा

लातूर दि. ८ जून : शहरातील कोल्हेनगर येथील रहिवासी असलेले सोमनाथ बाबुराव दापके या नावाचा इसम२० मार्च च्या सकाळी८:३० पासून घरात कोणालाही काहीही न सांगता घरातून बेपत्ता झाला असून त्याचा रंग सावळा आहे, उंची ५ फूट ११ इंच आहे, अंगात आकाशी रंगाचा शर्ट आणि काळ्या रंगाचे जिन्स पॅंट आहे, सोबत लाल रंगाची बॅग आणि ओपो कंपनीचा मोबाईल असून त्यात८३२९७१९५१५/७२७६१०३८९१ या क्रमांकाचे सीम कार्ड आहे

स्वाती सोमनाथ दापके यांनी पोलीसात खबर दिल्यावरून पोह एन . व्हि . नराळे पुढील तपास करत आहेत

# प्रवाशांचा वाली कोण ? लोकप्रतिनिधीसह कोणालाच वेळ नाही

**प्रमोद सुरवसे**



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ जून : पूर्वी हात दाखवा गाडी थांबवा हे ब्रीद वाक्य एसटी महामंडळाचे असायचे, प्रवाशी वाटेत कोठे का असेनात एसटी दिसली की हात दाखवायचे लगेच एस.टी . थांबायची, त्यामुळे प्रवाशांची सोय व्हायचो

मध्यंतरीच्या काळात बसमध्ये प्रवाशांसाठी गाण्यांची सोय केली गेली, ही योजना ठराविक बसमध्ये असलीतरी प्रवाशी गाणी ऐकत आपला प्रवास करायचे , काही कालावधी नंतर हो योजना बंद पडली, त्यानंतर प्रवाशांसाठी वायलायची योजना आली, प्रत्येक बसमध्ये वायलाय कसे वापरायचे याचे छोटे छोटे टिकर्स बसच्या दर्शनी भागात लावण्यात आली, याने प्रवाशांना मोफत वायफायची सुविधा मिळत असल्यामुळे बसमध्ये गर्दी वाढू लागली, काही काळानंतर हीसुद्धा योजना बंद पडली

अशा योजना कोणी सुरु केल्या आणि कोणी बंद पाडल्या हा संशोधनाचा विषय असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष केलेले बरे

जसा जमाना बदलत गेला तसा महामंडळाने बसमध्ये बदल करून शिवशाही, लालपरी, ई शिवाई अशा बस ताफ्यात आणल्या ह्या बस वातानुकुलीत असल्यामुळे तिकीट ही जवळजवळ दुपट्ट मोजावे लागत असल्यामुळे प्रवाशांवर हा अतिरिक्त भार कशासाठी ? उलट सर्वसामान्य प्रवाशांना परवडेल अशा बसेची निर्मिती होणे अपेक्षित असते पण महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांना लेकी आले तर ना ? तसेच जुन्या तिकीट काढण्यासाठी डब्ब्या ऐवजी ऑनलाईन तिकीट काढण्यासाठी मशीन आणली त्याबरोबरच ऑनलाईन पेमेंटसाठी महामंडळाचे कॅनल आणून ऑनलाईन व्यवहार करणाऱ्यांची सोय करून हम भी कुछ कम नही हे दाखवून दिले असले तरी वाहक - चालक यांच्या वागणुकीत काडीचाही बदल झाला नाही असे म्हटले तर वावगे ठरणार नाही, कारण वाहक प्रवाशांची नीट बोलत नाही, त्यांच्या अंगावर धावून येतात, बसमध्ये जागा असतानाही प्रवाशी बसमध्ये घेतले जात नाहीत, हे माझ्या समोर बऱ्याच वेळी घडले आहे, कधी - कधी हात दाखवून सुद्धा बस थांबत नाहीत, असेही घडले आहे, किंवा पाठीमागून दुसरी बस येत आहे किंवा ही जागा गाडी असल्याने तुम्ही दुसऱ्या बसनी या असा सल्ला दिला जात असल्याच्या घटना वारंवार घडताना दिसत आहेत, याची खातरजमा करायची असेल तर अधिकारी मंडळीनी साध्या वेशात बसस्थानकात जाऊन बघावे म्हणजे त्यांची खात्रीच पटेल आतातर काय - युद्ध अमेरिका आणि इराणचे झळा मात्र आपल्याला, त्यामुळे बहुतेक बस डिजेल चे कारण देऊन प्रवाशांवर अन्याय करत असल्याचे दिसत आहे, यासाठी आपण लातूर - औसा या प्रवासांवर बघू, औशावरून लातूरला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या अमाप असून यात विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी आणि इतर प्रवाशांचा समावेश होतो, सध्या बहुतेक बस ह्या शिवाजी चौकापर्यंतच जात असल्याचे वाहक किंवा चालक बसमध्ये चढण्या अगोदरच सांगतात असतात, जाणे जरूरी असल्यामुळे प्रवाशी बसमध्ये चढतात, पण ज्या प्रवाशांना मुख्य बसस्थानकापर्यंत जायचे असते त्यांना आति रिक्त१५/ चा दंड रिक्षाला द्यावा लागतो, आणि विशेष म्हणजे औसा ते लातूर बस भाडे आहे४२/ अतिरिक्त दरवाढ सह, लातूर वरून औशाला येता नाही प्रवाशांना असा त्रास सहन करावा लागतोच कारण औसा आगाराच्या बस सायंकाळी सातनंतर नाहीत, एखाद दुसरी चुकारु येते त्यामुळे सोलापूर, निलंगा किंवा उमरगा या मार्गांनी जाणाऱ्या बसचा सहारा प्रवाशांचा घ्यावा लागतो, या बस औसा मोड पर्यंतच प्रवाशी घेतात त्यामुळे तेथून खाली बसस्थानकांपर्यंत येण्यासाठी रिक्षाला वेगळे पैसे द्यावे लागतात, यातून प्रवासांवर किती अतिरिक्त खर्च करावा लागतो हे लक्षात येते

याबाबत औशाच्या डि एम शी फोनवर संपर्क करून विचारले असता ते म्हणतात की, लातूरवरून औशाला येणारी प्रत्येक बस नवीन बसस्थान कापर्यंत आलीच पाहिजे, मग याबाबत त्यांनी कोणता निर्णय घेतला हे सांगत नाहीत, किंवा औसा मोडवर एखादा कर्मचारी नियुक्त केला आहे का हे सर्व बघण्यासाठी, यात विशेष बाब अशी की, सकाळच्या वेळी बहुतेक बस नवीन बसस्थानकात येतात मग सायंकाळी येण्यासाठी त्यांना रोग येतो

लोकप्रतिनिधींचे याकडे लक्षच नाही, यात त्यांचा काय फायदा, ते तर इतर फायद्याच्या कामात व्यस्त असतात, अधिकारी सुद्धा याकडे लक्ष देत नाही मग प्रवाशांचा वाली कोण ?

## राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा आढावा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ जून : राष्ट्रीय आरोग्य असंसर्गजन्य कार्यक्रम तथा समन्वयक अधिकारी सहसंचालक डॉ. अर्चना भोसले यांनी लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, लातूर येथे वैद्यकीय अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी व कार्यक्रम समन्वयकांची आढावा बैठक घेतली. या बैठकीत टीबी, एनसीडी, कुष्ठरोग, पिएम जेवाय, आरबीएसके, आरसीएच, एनएचएम फायनांन्स, आयुष, एबीडीएम, तसेच विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचा आढावा घेऊन आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले.

यावेळी परिमंडळाच्या उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड, जिल्हा शल्य चिकित्सक आरोग्य सेवा डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे उपस्थित होते.

यावेळी डॉ. भोसले यांनी आरोग्य सेवा अधिक गुणवत्तापूर्ण व रुग्णकेंद्रित करण्यासाठी प्रलंबित बाबी तातडीने पूर्ण करणे, डेटा अद्ययावत ठेवणे, आरोग्य निर्देशकांमध्ये सुधारणा करणे व योजनांचा लाभ अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या सूचना दिल्या. तसेच त्यांनी महिला रुग्णालय लातूर येथील टेली कॉन्सलटेशन हब आणि डीईआयसी ला भेट देऊन कार्यपद्धती, उपलब्ध सेवा व प्रगतीचा आढावा घेतला. ग्रामीण नागरिकांना तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला सहज व मोफत उपलब्ध करून देणाऱ्या य उपक्रमाबाबत आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

### सामूहिक श्री गुरुचरित्र सारामृत पारायण

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ जून : अधिक मासानिमित्त आयोजित सामूहिक श्री गुरुचरित्र सारामृत पारायण व श्री गुरुचरित्र कथामृत सोहळ्यास रविवार (दि. ७) प्रारंभ झाला. आत्मोन्नती, आत्मोद्धार, विश्र्वकल्याण आणि विश्र्वशांती हे ध्येय समोर ठेवून संकल्पित करण्यात आलेल्या या सात दिवसीय सोहळ्यात भाविकांनी सहभाग नोंदविला आहे.

यात मकरंद महाराज, गुरुमाई मानसी मकरंद वैद्य यांचे मार्गदर्शन लाभत आहे. अधिक मासाच्या कालावधीत गुरुतत्त्व प्रदीप परिवारातर्फे आयोजित करण्यात येत असलेल्या उपक्रमांमधील हा तिसरा भव्य सोहळा आहे. सामूहिक साधना, सामूहिक प्रार्थना आणि सामूहिक चिंतन यांच्या माध्यमातून व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांना सकारात्मक दिशा देण्याचा हा प्रयत्न असल्याचे आयोजकांनी सांगितले. सात दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात श्री गुरुचरित्र सारामृत पारायण, श्री गुरुचरित्र कथामृत, नामभक्ती, आरती, आध्यात्मिक मार्गदर्शन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

### लोकनेते विलासराव देशमुख यांच्या लोककार्याच्या प्रचारासाठी
## जनार्दन पाटील यांची आग्रा ते बाभळगाव यात्रा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ जून : महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख यांच्या लोककल्याणकारी कार्याची संपूर्ण माहिती आणि विचारांचा देशभरात प्रसार करण्यासाठी दिल्ली येथील जनार्दन पाटील यांनी आग्रा ते बाभळगाव (ता. लातूर) अशी विशेष कार यात्रा काढली.

शनिवारी ही यात्रा लातूरमध्ये पोहोचली. रविवारी सकाळी जनार्दन पाटील यांनी बाभळगाव येथील लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतीस्थळी जाऊन आदरांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांनी बाभळगाव निवासस्थानी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांची भेट घेतली. यावेळी त्यांचा त्यांनी यथोचित सन्मान करून त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या. यावेळी बाभळगावचे माजी उपसरपंच गोविंद देशमुख उपस्थित होते.

### हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक योजना
## मुरुडचे बसस्थानक राज्यात तिसरे



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ जून : हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ व सुंदर बस स्थानक योजनेत मुरुडच्या बस स्थानकास महाराष्ट्रात तिसरा क्रमांक मिळाला आहे तर मराठवाड्यात दुसरा क्रमांक मिळाला आहे.

बारामती बस स्टॅन्ड महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाचे आले आहे तर औसा येथील बस स्थानक महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकावर आहे. बारामतीचे बस स्टॅन्ड व औसा बस स्टैंड इमारत बांधण्यासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाला होता तर मुरुडच्या बस स्थानकासाठी माजी आमदार धीरज देशमुख यांच्या निधीतून ८० लाख रुपयांच्या निधी इमारत बांधकामासाठी मंजूर झाला होता. मुरुड येथील बसस्थानकासाठी बारामती आणि औसाच्या तुलनेत अतिशय अल्प निधी असतानाही हे बस स्थानक महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकावर आले आहे. त्याचे कारण म्हणजे मुरुड बसस्थानकात कार्यरत असणारे कर्मचारी वाहतूक नियंत्रक बाळासाहेब देवकर आणि स्वीपर मोहन गायकवाड दोघेही मुरुड येथे घर करून राहतात. त्यामुळे २४ तास बस ते बसस्थानकात हजर असतात.

गावातील सामाजिक आणि राजकीय कार्यकर्त्यांना हाताशी धरून बस स्थानकाचे काम चांगल्या दर्जाचे करून घेण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. हे दोन्हीही कर्मचारी स्थानकाची स्वच्छता स्वतः करून घेतात. बस स्थानकातील सुलभशौचालय योजनेतील संडास बाथरूम नेहमी स्वच्छ असतो. या ठिकाणी घाणीचे साम्राज्य दिसून येणार नाही. दोघेही गेल्या दहा वर्षापासून याच बसस्थानकात कार्यरत आहेत.

बस स्थानकाच्या ऑफिसमध्ये थोर पुरुषांची व्यक्तिमत्व असलेले छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, पंडित नेहरू, अण्णाभाऊ साठे, महात्मा फुले, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची छायाचित्रे भितीवर अतिशय सुबकरीत्या लावलेली आहेत. वर्षभर येणाऱ्या सर्व थोर पुरुषांची पुण्यतिथी व जयंती या बसस्थानकात साजरी करतात.

या बसस्थानकातून दिवसभरातून येणाऱ्या आणि जाणाऱ्या बसेसच्या फेऱ्यांची संख्या ५६० एवढी आहे.

वर्षभर बाराशे विद्यार्थी योजनेचा पास घेऊन आपले शिक्षण घेत आहेत. या बस स्थानकाच्या तिन्ही बाजूंनी व्यापारी संकुल आहे. जवळजवळ १ लाख रुपयांचे भाडे दर महिन्यास उत्पन्न म्हणून शासनाकडे जमा होत आहे

सहकारमहर्षी शिवाजीराव नाडे प्रतिष्ठानच्या वतीने प्रवाशांना पाणी पिण्यासाठी प्रवीण पाटील यांनी विंधन विहीर पाडून दिली आहे. त्यामुळे पिण्याची पाण्याची सोय उपलब्ध आहे. प्रवाशांना आणि विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये म्हणून हे दोन्ही कर्मचारी पोलिस ठाण्याच्या नेहमी संपर्कात असतात. गावातील सामाजिक कार्यकर्त्यांकडून सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घेतलेले आहेत. बस बसस्थानकात अतिशय स्वच्छ आणि टॉपटीप असलेले उपहारगृह प्रवाशांना उपलब्ध आहे. आलेल्या प्रवाशाची कसलीही हेळसांड होणार नाही याची काळजी येथील कर्मचाऱ्याकडून घेतली जाते. अनेक गोष्टींचा विचार करून शासनाने मुरुडच्या बसस्थानकास मराठवाड्यातून दुसरे व महाराष्ट्रातून तिसरे बक्षीस स्वच्छ व सुंदर बस स्थानकासाठी दिलेले आहे. रोख एक लाख रुपयाचे पारितोषिकही दिले आहे.

### धिरज देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश
## एकूरगा जिल्हा परिषद शाळेस इयत्ता ९ वीची तुकडी मंजूर



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ८ जून : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून, लातूर तालुक्यातील एकूरगा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेस इयत्ता ९ वीची तुकडी मंजूर करण्यात आली आहे. या निर्णयामुळे परिसरातील विद्यार्थ्यांच्या पुढील शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला असून पालक व ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जिल्हा परिषद लातूरच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालयाकडून याबाबत आ-देश निर्गमित करण्यात आला आहे. संबंधित आदेशानुसार एकूरगा येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता ९ वीचा वर्ग सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी दूरच्या ठिकाणी जावे लागणार नाही. या मागणीसाठी धिरज

विलासराव देशमुख यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, ग्रामीण भागातील मुलांना त्यांच्या गावातच दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे आणि शाळेची शैक्षणिक प्रगती व्हावी या उद्देशाने त्यांनी संबंधित विभागाशी समन्वय साधून हा प्रश्न मार्गी लावला.

इयत्ता ९ वीची तुकडी मंजूर झाल्याने परिसरातील विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून, या बद्दल लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना, शिक्षण अधिकारी तृप्ती अंधारे, जिल्हा परिषद सदस्य दत्तात्रय टेकाळे, गणेश ढगे, शाळेचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यांचे ग्रामस्थांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत. यावेळी ग्रामस्थांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी धिरज देशमुख सातत्याने प्रयत्नशील असून त्यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागत आहेत. एकूरगा जिल्हा परिषद शाळेस मिळालेली ही मंजुरी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि भविष्य घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हीच आमची प्राथमिकता आहे, अशी भावना यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्याकडून व्यक्त करण्यात आली.

## अग्रलेख...

# ...तरच टळेल देवस्थानांवरील बालंट

सत्ता कुणाचीही असली तरी हिंदू समुदायाला वारंवार विविध प्रकारच्या कसोट्यांना सामोरे जावेच लागते. विद्यापीठ अनुदान आयोगाने काही महिन्यांपूर्वी आणलेले 'यूजीसी विधेयक-२०२६' किंवा महाराष्ट्र सरकारने प्रस्तावित केलेला देवस्थान इनाम निर्मूलन कायदा हे त्याचे ताजे उदाहरण. हिंदूंच्या भावना दुखावणारा देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम आराखडा आता स्थगित करण्यात आला असला तरी तो सरकारने जारी केला होता, हे दुःखद आहे. मात्र, त्यातील इष्टापत्ती अशी की, या निमित्ताने हिंदू समाज मंदिरांच्या व्यवस्थापनांच्या किंवा जमिनींच्या मुद्द्यांवर आता विचार करायला लागेल. एरवी हा विषय कुणाच्या गावीही नसतो.

हा मसुदा जारी होताच हिंदुत्ववादी संघटनांनी विरोध सुरू केला. विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र मंदिर महासंघाने राज्यभरात आंदोलने सुरू केलीत. जुने वाद मिटविण्याच्या गोंडस नावाखाली या कायद्याचा घाट घातला गेला. वर्तमान इनाम व्यवस्था रद्द करणे, जमिनीवरील मालकी हक्क संपुष्टात आणणे, सध्या ज्यांच्याकडे देवस्थानची जमीन आहे किंवा ज्यांनी अतिक्रमण केले आहे किंवा ज्यांनी कायद्यातील पळवाटांचा फायदा घेत ताबा मिळविला आहे अशांना जमिनीचा मालकी हक्क प्रदान करणे हा या कायद्याचा उद्देश होता, असा या मसुद्याला विरोध करणाऱ्यांचा दावा होता. मंदिरांच्या जमिनींचे वाद आहेतच. त्यावर तोडगे काढणे गरजेचे आहेच. पण, मूळ समस्येचा अभ्यास न करता एकदम प्रारूप आणणे अनाठायी होते. हिंदू समाजाला असे वाटते की, इतर धर्मांच्या देवस्थानांसाठी अशा प्रकारचे कायदे लागू करण्याचा विचार सरकारच्या मनात येत नाही. येऊन-जाऊन दिसतो तो हिंदू समाज. इतर समुदायांच्या धर्मस्थळांचे कारभार बिनबोभाट चालू द्यायचे आणि जमिनी हिसकावून घ्यायच्या त्या हिंदू मंदिर संस्थांच्या. या कायद्याच्या मसुद्यावरून एक बाब उघड होते आणि ती म्हणजे शासनाने प्रारूप मसुदा जाहीर करण्यापूर्वी कोणताही अभ्यास केला नव्हता. हिंदू संस्कृतीच्या मुळावर घाव घालण्याचे प्रकार काँग्रेस राजवटींनी केले आणि त्या पक्षाला त्याची किंमत मोजावी लागली. एके काळी साऱ्या देशावर राज्य असलेला काँग्रेस पक्ष आता सत्तेत फार थोडा शिल्लक आहे. वर्तमान सरकारांनी या इतिहासापासून शिकले पाहिजे. आता हिंदू संघटनांनी विरोध केल्याने देवस्थान इनाम कायद्याच्या मसुद्याला स्थगिती दिल्याची घोषणा राज्य सरकारने केली असली तरी मुळात हा मसुदा आणलाच का गेला होता, हा खरा प्रश्न आहे. कायदा आणायचाच होता तर अन्य धर्मीयांच्या धार्मिकस्थळांना यातून का वगळण्यात आले, हाही कळीचा प्रश्न आहे. अनेक मंदिरांच्या जमिनीवर ठिकठिकाणी अवैध कब्जा करण्यात आला आहे. भाडे तत्त्वावर जमीन कसणाऱ्यांनी काही काळानंतर ताबा मिळविल्याची अथवा एससी/एसटी कायद्याचा धाक दाखवीत देवस्थानच्या जमिनीवर कब्जा केल्याची अनेक उदाहरणे राज्यात आहेत. देशातही आहेत. हे वाद सोडवावे लागतीलच. परंतु, अतिक्रमण करणाऱ्यांना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे फायदा होऊ नये, याचीही काळजी घ्यावी लागेल. भारतीय संविधानातील २५ आणि २६ ही कलमे धार्मिक स्वातंत्र्यासंदर्भात मूलभूत अधिकार प्रदान करतात. कलम २६ हे धार्मिक संस्थांना स्वतःच्या धार्मिक व्यवहाराचे व्यवस्थापन करण्याचे अधिकार देते. महाराष्ट्र सरकारने कायद्याचा जो मसुदा आणला होता, तो संविधानातील कलम २५ आणि २६ चे सरळसरळ उल्लंघन करणारा आहे. भारतीय संविधान सर्व धर्मीयांना समान धार्मिक अधिकार देण्याचा सिद्धांत मांडते. असे असताना केवळ हिंदूंच्या देवस्थानांवरच वक्र नजर टाकण्याचे प्रयत्न सरकारने केले आणि त्यामुळे हिंदू समाज नाराज झाला होता. ती नाराजी कायमची संपवायची असेल तर पूर्ण अभ्यास केल्याखेरीज सरकारने यापुढे असे पाऊल टाकू नये, असा सल्ला द्यावासा वाटतो.

काहीही गरज नसताना अथवा असा कायदा आणावा, यासाठी कुणीही मागण्या किंवा आंदोलने केली नसताना हिंदू देवस्थानांवर अशी वक्र नजर टाकण्याची अवदसा का सुचावी, हा रास्त मुद्दा प्रारूपाच्या विरोधकांकडून मांडला गेला. नवीन कायदाच आणायचा असता तर सर्वप्रथम मंदिरांच्या जमिनीचे सर्वेक्षण करून त्यावरील अतिक्रमण हटविणे आवश्यक होते. तसे न करता अतिक्रमण करणाऱ्यांच्या घशात जमिनी घालण्याचा डाव आखण्यात आला होता, असे कुणी या मसुद्याकडे पाहून म्हटले तर त्याला चुकीचे ठरविता येणार नाही. देवस्थान इनाम व्यवस्था ही काही आत्ता-आत्ता आलेली नाही. या व्यवस्थेचे मूळ मध्ययुगीन आणि ब्रिटिशपूर्व काळातील आहे. राजे, महाराजे, सरदार किंवा स्थानिक सत्ताधीश मंदिर, मठ किंवा देवतांच्या नावे जमीन इनाम करून देत असत किंवा रोख अथवा वस्तुरूपात दानाची व्यवस्था करीत असत. मंदिर अथवा देवस्थान यांच्याभोवती त्या परिसरातील अर्थव्यवस्था फिरत असते. छोटे-मोठे व्यवसाय त्यावर चालतात आणि अनेकांच्या घरच्या चुली पेटतात. धार्मिक सेवा, पूजा-अर्चना, अन्नछत्र अथवा यात्रा-महोत्सवासाठी देवस्थानांना इनामे दिली जात असत. त्यातून सामाजिक कामेही होतात. आजही यात्रा-महोत्सवासाठी सार्वजनिक वर्गणी करणे ही व्यवस्था आहेच. ब्रिटिशांनीही देवस्थानच्या जमिनींना कायदेशीर स्वरूप प्राप्त करून दिले होते. देवस्थानांना मिळणाऱ्या अनुदानाची, इनामांची तपासणी करण्यासाठी इनाम आयोग स्थापन केला होता. बॉम्बे रेंट फ्री इस्टेट्स ॲक्ट-१८५२ आणि एक्झम्प्शन्स ॲक्ट-१८६३ हे कायदे करून इंग्रजांनी इनामांचे व्यवस्थित नियमन केले होते. असंख्य श्रद्धाळू नागरिकांनी मंदिरांना जमिनी दिल्या आहेत. संपत्ती दिली आहे. त्यांच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नातून विविध धार्मिक-आध्यात्मिक आणि सामाजिक कार्ये पार पाडली जातात. इनामी जमिनी या देवस्थानांच्या आर्थिक व्यवस्थेचा आधारस्तंभ आहेत. हा कायदा मंजूर झाला असता तर ग्रामीण भागातील मंदिर व्यवस्थापनांना मोठा फटका बसला असता. मंदिरे ही भारतीय संस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहेत. ती आपल्या सनातन संस्कृतीची जिवंत केंद्रे आहेत. राज्यात हजारोंच्या संख्येने असलेली मंदिरे केवळ धार्मिक विधी करण्याची स्थळे नव्हेत. ती धर्म, इतिहास, लोकपरंपरा, स्थापत्य आणि सांस्कृतिक स्मृती जपणारी केंद्रे आहेत. देवस्थानांकडे केवळ जमीन व्यवस्थापन अथवा महसुलाच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यांच्या सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक पैलूंवर विचार करणे आवश्यक आहे. हिंदू संघटनांच्या दबावामुळे सरकारला हा प्रारूप मसुदा मागे घ्यावा लागला. पण, हा मसुदा केवळ स्थगित केला गेला आहे. तो रद्द झालेला नाही. तो रद्द केल्याचे आणि आता अभ्यास केल्याशिवाय या विषयाला हात लावला जाणार नाही, असे सरकारने जाहीर केले पाहिजे. कायद्याच्या नवीन प्रारूपासाठी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली गेली आहे हे खरे. पण, सरकारने सर्वप्रथम देवस्थानांच्या जमिनींवरील अतिक्रमणे हटवावीत; जमिनींची मोजणी करून देवस्थानच्या ताब्यात द्याव्यात आणि नंतर हा कायदा आणावा. त्यासाठी या समितीत जाणत्या लोकांचा समावेश करावा. हिंदू समाजाच्या प्रतिनिधींना समाविष्ट करून घ्यावे. सल्लामसलत करावी. कायदा असो वा कायद्याचे प्रारूप, ते चर्चेतूनच पुढे आणले जाते. कायदा तयार करण्याची प्रक्रिया घिसाडघाईची नसते. एखाद्या विषयावर कायदा करायचा असल्यास त्याच्या सर्व बाजू विचारात घ्याव्या लागतात. कोणता मुद्दा समाजाच्या हिताचा आणि कोणता समाजाला घातक असेल, हे ठरवावे लागते. त्यासाठी मुक्त चर्चा व्हावी लागते. नागरिकांची मते ऐकून घ्यावी लागतात. यापूर्वी अनेक वेळा अनेक कायद्यांच्या बाबतीत हे टप्पे पाळले गेले आहेत. हिंदूंची देवस्थाने देखील याच प्रक्रियेच्या माध्यमातून पाहिली व हाताळली गेली पाहिजेत. त्याची पुरेशी काळजी यापुढे सरकारने घ्यावी आणि मंदिरे ही समाजाच्या धार्मिक आणि आध्यात्मिक स्वायत्ततेची प्रतीके आहेत, हे समजून पुढचे पाऊल टाकावे, असेही यानिमित्ताने सुचवावेसे वाटते. तसे झाले तरच देवस्थानांवर आलेले सरकारी बालंट टळेल.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# पेंटागॉन विरुद्ध ॲक्टागॉन

क्रेमलिन विरुद्ध व्हाईट हाऊस! दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोवियत युनियन यांच्यात सुरू झालेल्या शीतयुद्धाची व जागतिक महाशक्तींची ही दोन प्रतीके होती. व्हाईट हाऊस पांढऱ्या रंगाचे असल्याने त्याला हे नाव पडले आणि क्रेमलिन हे नाव 'क्रेमल्या' या शब्दावरून देण्यात आले. रशियन भाषेत किल्ल्यासाठी 'क्रेमल्या' हा शब्द वापरला जातो.

सोवियत युनियनचे पतन झाल्यानंतर क्रेमलिनचेही महत्त्व कमी झाले, त्याचे बुरुज भुसभुशीत झाले तर व्हाईट हाऊस मात्र अद्याप दिमाखात उभे आहे. सध्याच्या लघु तिसऱ्या महायुद्धानंतर पेंटागॉन विरुद्ध ॲक्टागॉन ही अमेरिका व चीन या दोन महाशक्तींमध्ये सुरू होणाऱ्या शीतयुद्धाची प्रतीके राहणार आहेत.

**पेंटागॉन :** पेंटागॉन हे अमेरिकन लष्कराचे मुख्यालय. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ते विक्रमी अशा १६ महिन्यांमध्ये बांधण्यात आले. जवळपास २५ एकर जागेवर बांधण्यात आलेल्या या वास्तूमध्ये २५ किलोमीटर लांबीची दालने आहेत. पंचाकृती आकाराचे पेंटागॉन प्रसिद्धीस आले ते २००१ च्या सप्टेंबर महिन्यात अल कायदाच्या अतिरेक्यांनी केलेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर. अल कायदाच्या दहशतवाद्यांनी अमेरिकन एअरलाईन्सचे विमान पेंटागॉनवर आदळविले होते. यात पेंटागॉनचा काही भाग उद्ध्वस्त झाला, नंतर त्याची नव्याने बांधणी करण्यात आली. हा हल्ला एका इमारतीवर नव्हता, तर अमेरिकेच्या लष्करी सामर्थ्यावर होता. सहा मजले असलेल्या पेंटागॉनमध्ये २४ हजारांवर लोक काम करतात. साऱ्या जगावर नियंत्रण ठेवण्याचे काम या वास्तूतून केले जाते. अमेरिकन लष्कर, वायुदळ आणि नौदल या तिन्ही दळांची कार्यालये या एका वास्तूत आहेत. यामुळे पेंटागॉन हे अमेरिकेच्या सामर्थ्याचे जणू प्रतीक झाले आहे.

**चीनचे ॲक्टागॉन :** चीनने आपल्या नव्या लष्करी मुख्यालयाची अधिकृत घोषणा वगैरे केलेली नसली तरी शियान जियांग या वाळवंटी प्रांतात तीन इमारती बांधल्या गेल्याचे चित्र उपग्रहांनी टिपले आहे. या इमारती अष्टकोनी असून त्यांची छायाचित्रे प्रथमच जगासमोर आली आहेत. या इमारतींमध्ये प्रामुख्याने लष्करी अधिकारी व सैन्य यांच्या निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे. शिवाय त्यात अवजड लष्करी वाहने सुरक्षितपणे ठेवण्याचीही व्यवस्था करण्यात आली आहे. या दोन्ही इमारतींच्या बाजूला भरभक्कम बांधकाम करण्यात आले असून त्यात शस्त्रास्त्रे साठविण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याचे म्हटले जाते. हा भाग हवाई मार्ग व रेल्वे मार्ग यांनी जोडण्यात आला आहे. हा सारा भाग चीनच्या हामी या अण्वस्त्रे असलेल्या भागापासून १३० किलोमीटर असल्याचे मानले जाते तर तिसरी इमारत २४० किलोमीटर अंतरावर बांधण्यात आली आहे. इंटर कॉंटिनेंटल बॅलेस्टिक मिसाईल्स म्हणजे आयसीबीएम वाहून नेण्याची क्षमता असणारे ट्रकही या परिसरात दिसून आले आहेत.

**अमेरिकेला धक्का? :** चीनच्या या ॲक्टागॉनने अमेरिकेला जरा आश्चर्यचकित केले असून, आपल्या लष्करी वर्चस्वाला यामुळे धक्का बसण्याची त्याला चाहूल झालेली दिसते. काहीच दिवसांपूर्वी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी बीजिंगला भेट दिली. सरकारी मेजवानीत त्यांचे भाषण झाले. एका सम्राटासमोर एका मांडलिक राजाने भाषण करावे असे ते भाषण होते. त्यांनी चीन व त्यांच्या राष्ट्रपतींवर स्तुतिसुमने उधळली असली तरी त्यात एक महत्त्वाचा मुद्दा होता. चीन आता केवळ आर्थिक ताकद राहिलेला नाही तर एक लष्करी ताकद म्हणूनही त्याचा उदय झाला असल्याचे प्रतिपादन शाहबाज शरीफ यांनी केले. शरीफ यांचे प्रतिपादन बरोबर आहे. भारत-पाकिस्तान यांच्यात मागील वर्षी झडलेल्या संघर्षात चीनने पाकिस्तानला अद्ययावत तंत्रज्ञान पुरविले होते. त्यात बीव्हीआर म्हणजे बियाँग व्हिजुअल रेंज तंत्रज्ञान पाकिस्तानी वैमानिकांना पुरविण्यात आले होते. सध्या सुरू असलेल्या अमेरिका-इराण युद्धातही चीन आपले लष्करी तंत्रज्ञान इराणला पुरवीत असल्याचे दिसून आले आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करीत इराणने अमेरिकेचे एफ-१५ विमान पाडण्यात यश मिळविले तर आजवर अभेद्य मानल्या जाणाऱ्या एफ-३५ या विमानाला जायबंदी करण्यात यश मिळविले. या युद्धात इराणने अमेरिकेची २० लष्करी ठिकाणे बेचिराख करण्यात यश मिळविले. इराणला हे सारे करता आले ते केवळ चीनकडून सतत पुरविल्या जाणाऱ्या लष्करी साहित्यामुळे व त्यासोबत पुरविलेल्या तंत्रज्ञानामुळे.

**शांग्रिला डायलॉग :** सिंगापूरमध्ये मागील काही वर्षांपासून 'शांग्रिला डॉयलाग' नावाचा एक कार्यक्रम आयोजित केला जातो. त्यात देशादेशांचे लष्करी प्रतिनिधी सहभागी होतात व आपली भूमिका मांडतात. मागील वर्षी या कार्यक्रमात भारताच्या सरसेनापतींनी ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने काही लढाऊ विमाने गमावल्याचे मान्य केले होते व त्यावरून मोठा गदारोळ झाला होता. यावर्षीच्या आयोजनात अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांचे भाषण चर्चेचा विषय राहिले.

**'शांततेसाठी युद्ध' :** पीट हेगसेथ हे स्वतः लष्करात होते. 'चिर शांततेसाठी युद्ध' हे आपल्या पलटणीचे ब्रीदवाक्य होते असे सांगत त्यांनी आपल्या भाषणाचा प्रारंभ केला आणि या ब्रीदवाक्यानेच त्यांनी आपल्या भाषणाचा शेवटही केला. हेगसेथ यांचे भाषण चांगले होते, पण काही दिवसांपूर्वीच अमेरिकन सिनेट समितीच्या बैठकीत हेगसेथ यांच्या व्यभिचाराच्या चिंधड्या उडविण्यात आल्या होत्या.

**चीनचा उल्लेख :** आपल्या भाषणाचा मुख्य मुद्दा चीन हा ठेवताना हेगसेथ म्हणाले, चीनने ज्याप्रकारे लष्करी सामर्थ्याची जमवाजमव चालविली आहे त्याने सर्वांच्या मनात चिंता निर्माण होणे स्वाभाविक आहे. चीनने आशियावर आपला एकछत्री अंमल स्थापन करण्याचा प्रयत्न करू नये अशी अमेरिकेची स्पष्ट भूमिका आहे. पश्चिम युरोपातील देश व नाटो देश यांना इशारा देताना हेगसेथ म्हणाले, अमेरिकेने या देशांच्या लष्करी खर्चाचा भार वाहण्याचे दिवस आता सरले आहेत. प्रत्येक देशाने आपल्या संरक्षणाचा भार उचलला पाहिजे. आर्थिक संपन्न असलेल्या देशांनी तर याचे विशेष भान ठेवले पाहिजे. दक्षिण कोरिया, मलेशिया, जपान, थायलंड, ऑस्ट्रेलिया या देशांचे कौतुक करताना हेगसेथ म्हणतात, या सर्व देशांनी आपापल्या संरक्षण खर्चात वाढ केली आहे.

**केवळ चर्चा नकोत :** केवळ चर्चा, परिषदा याचे दिवस आता संपले आहेत. थोडक्यात शांग्रिला भरविण्याचे दिवस संपलेले आहेत. तर याउलट युद्धनौका, पाणबुड्या बांधण्याचा काळ आता आला आहे. अमेरिकेने आपल्या संरक्षण खर्चात मोठी वाढ करण्याचा निर्णय घेतला असून आम्ही १.५ ट्रिलियन डॉलर एवढी रक्कम संरक्षणावर खर्च करण्याचे ठरविले आहे. अमेरिकन लष्कराचे सामर्थ्य वाढविण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.

**शस्त्र-स्पर्धा वाढणार? :** अमेरिकेच्या संरक्षणमंत्र्यांनी सिंगापूरच्या शांग्रिला परिषदेत केलेल्या भाषणाचा स्पष्ट अर्थ म्हणजे जगात आता शस्त्र-स्पर्धा वाढणे अटळ आहे. प्रत्येक देशाने आपल्या संरक्षण खर्चात वाढ करावी असेच त्यांनी सुचविले आहे. यातील गूढ अर्थ म्हणजे ही शस्त्रे खरेदी करण्यासाठी त्यांनी अमेरिकेचा रस्ता धरावा हेही त्यांनी सुचविले आहे.

**शस्त्र कंपन्यांची चांदी! :** अमेरिका-इराण युद्धामुळे साऱ्या जगावर मंदीचे सावट पडले आहे. याचा भारतासह काही देशांना चांगला फटका बसत आहे आणि बसणार आहे. पण याची चिंता ना राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांना आहे आणि ना त्यांच्या संरक्षणमंत्र्यांना. त्यांनी उघडपणे जगाला शस्त्रसज्ज होण्याचा मंत्र दिला आहे. याने लॉकहीड मार्टिन, आरटीएक्स, नॉर्थरॉप ग्रुमन, जनरल डायनामिक्स आणि बोईंग डिफेन्स या पाच प्रमुख शस्त्र उत्पादन करणाऱ्या अमेरिकन कंपन्यांची मात्र चांदी की सोने होणार आहे.

अमेरिका-इराण युद्ध सुरू होण्यापूर्वी हेगसेथ यांनी काही शस्त्र कंपन्यांचे शेअर्स खरेदी केल्याचे वृत्त अमेरिकेच्या 'वॉल स्ट्रीट जर्नल' या वृत्तपत्राने प्रसिद्ध केले होते, ते काही उगाच नाही.

## वेध

हेमंत सालोडकर

# एसटीचे उत्पन्न वाढावे हीच इच्छा

सर्वसामान्य प्रवाशांची जीवनवाहिनी अर्थात एसटीच्या हितसंरक्षणाची जबाबदारी म्हणून बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात अवैध वाहतूक केल्यास संबंधितांना तुरुंगवासाची शिक्षा होणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागाला शहराशी जोडणाऱ्या एसटीच्या उत्पन्नात वाढ होईल अशी आशा आहे. अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एसटीचे आर्थिक नुकसान तर होतेच, पण प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे बसस्थानक परिसरात कायद्याचे काटेकोर पालन करून अवैध वाहतुकीला पूर्णपणे आळा घालण्यासाठी प्रशासनाने काही नियमांचे पालन करणे अपेक्षित असल्याने समन्वयाने काम करावे, अशी अपेक्षा परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली आहे. ही अपेक्षा व्यक्त करतानाच प्रवाशांना सुरक्षित, शिस्तबद्ध आणि दर्जेदार सेवा देणे हे एसटी महामंडळाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. ५ ते १५ जून या दरम्यान विशेष मोहीम हाती घेण्यात येणार आहे. या मोहिमेमुळे बसस्थानक परिसरातील शिस्त वाढण्यास, एसटीचे उत्पन्न वाढण्यास आणि प्रवाशांना अधिक सुरक्षित व सुव्यवस्थित सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल, यात शंका नाही.

सर्वांची लाडकी एसटी ही नेहमीच तोट्यात असते. तिचे उत्पन्न वाढावे यासाठी शासनातर्फे नेहमीच उपाय शोधले जातात. पण फारसा उपयोग होताना दिसत नाही. त्याला अनेक कारणे असली तरी बसस्थानकाबाहेरून होणारी अवैध प्रवासी वाहतूक हेही एक मुख्य कारण आहे. आता या अवैध प्रवासी वाहतुकीलाच चाप बसणार आहे. सर्व एसटी बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात होणाऱ्या अवैध प्रवासी वाहतुकीस आळा घातला जाणार आहे. त्यासाठी राज्यभर विशेष अंमलबजावणी मोहीम राबवली जाणार आहे. ही अवैध वाहतूक रोखली गेल्यास एसटी महामंडळाच्या उत्पन्नात आपोआप भर पडणार आहे. या मोहिमेअंतर्गत पुढील दहा दिवस सर्व विभागांमध्ये संयुक्त तपासणी व अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येणार आहे. तसे परिपत्रक एसटी महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागाने जारी केले आहे. राज्यातील सर्व एसटी बसस्थानकांच्या २०० मीटर परिसरात खाजगी वाहने उभी करून प्रवाशांची वाहतूक करणे यावर बंदी राहणार आहे. असा नियम केला तरी यापुढे अवैध प्रवासी वाहतूक होणार नाही हे कशावरून? काही लोक यातून पळवाट काढतीलच. त्यांना कोण रोखणार?



ग्रामीण भागाला शहराशी जोडणारी अशी एसटीची ओळख आहे. कितीतरी निकृष्ट दर्जाच्या बसेसमधून आजही लोक प्रवास करीत आहेत. ग्रामीण भागात आजही एसटीला पर्याय नाही. त्यामुळे लोक त्यानेच प्रवास करतात. पण शहरात अशी परिस्थिती आहे का? नागपूर किंवा मोठ्या शहरांच्या बसस्थानकाबाहेरून अवैध प्रवासी वाहतूक सुरूच असते. अनेक जण जवळपासच्या जिल्ह्यात जाण्यासाठी खाजगी चारचाकी वाहनांचा उपयोग करतात. त्यात एकटे जाण्यापेक्षा एसटीच्या भाड्याएवढे पैसे देऊन लोक प्रवास करतात आणि आपल्या नियोजित स्थळी पोहोचतात. काही जण म्हणतील यात गैर काय आहे? त्यांच्या दृष्टीने असा प्रवास करणे सोयीस्कर ठरेल. निकृष्ट दर्जाच्या बसने जाण्यापेक्षा वातानुकूलित कारने जाणे कधीही चांगले, असेच मत त्यांचे असणार. पावसाळ्यात गळती लागलेल्या बसपेक्षा खाजगी वाहनाचा प्रवास कधीही चांगला, हाच विचार ते करतील. दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे वेळ वाचणे. उत्तम सुविधा आणि वेळेची बचत होत असेल तर लोक खाजगी वाहतुकीचा पर्याय निवडतील.

चांगल्या सुविधा मिळाल्या तर लोक अधिकचे पैसे देऊनही प्रवास करतात हे शिवाई बसने सिद्ध केले आहे. आरामदायक सीट, वातानुकूलित यंत्रणा आणि नियोजित स्थळी लवकर पोहोचण्याची हमी असल्याने लोकांनी शिवाई बसला पसंतीची पावती दिली आहे. आता शासनाने अनेक पर्यावरणपूरक बसेस विकत घेण्याचे ठरवले आहे. त्यासोबतच ती योग्यरीत्या चालवणारे चालक आणि प्रवाशांना सौजन्यपूर्ण वागणूक मिळाली तर लोक जास्तीचे पैसे देऊनही एसटीला पसंती देतील. मोठ्या शहरांत सार्वजनिक वाहतूक सुविधा असतानाही लोक अधिकचे पैसे मोजून कॅबने जातातच. नियम कडक करून काही दिवसांसाठी अवैध वाहतुकीला चाप बसेलही पण सुविधा मिळाल्या नाही तर येरे माझ्या मागल्या अशी स्थिती होण्याची शक्यता आहे. त्यामुळे इतरांची रेष लहान करण्यापेक्षा आपली रेष कशी मोठी होईल याकडे परिवहन मंडळाने लक्ष देणे गरजेचे आहे. त्यामुळे लोकांची पावले बसस्थानकांकडे वळतील आणि एसटीचे उत्पन्नही वाढेल.

९८५०७५३२८१

## कानोसा

अमोल पुसदकर

# झेप आमुची यशाकडे

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी या तुलनेने मागास समजल्या जाणाऱ्या गावातील एक तरुण, तेजकुमार सत्यनारायण बंडीवार, यांची भारतीय वायुसेनेत फ्लाईंग ऑफिसर म्हणून निवड झाल्याची बातमी प्रेरणादायी ठरली आहे. सुमारे सहा लाख विद्यार्थ्यांनी दिलेल्या परीक्षेतून दहा हजार विद्यार्थी मुलाखतीसाठी पात्र ठरले आणि त्यामध्ये तेजकुमार यांना अखिल भारतीय स्तरावर ८० हा क्रमांक मिळाला. ही केवळ वैयक्तिक यशोगाथा नसून आजच्या स्पर्धात्मक युगात यश मिळवण्यासाठी लागणारी दुर्दम्य इच्छाशक्ती, ध्येयाकरिता समर्पण, मेहनत, शिस्त आणि चिकाटीचे उत्तम उदाहरण आहे. त्याने जेव्हा उत्तीर्ण झाल्याची बातमी दिली, त्यावेळेस मी त्याचे अभिनंदन केले व त्याला विचारले की, पगार आणि इतर सोई काय असतात? त्यावर त्याने त्याला माहीत असलेली माहिती सांगितली व शेवटी तो म्हणाला की, पगार आणि सुखसोईंपेक्षा देशासाठी काम करायला मिळणे व भारतीय वायुसेनेचा गणवेश अंगावर घालायला मिळणे हाच मोठा सन्मान आहे.

आज अनेक क्षेत्रांमध्ये आपले भविष्य घडवायला निघालेले विद्यार्थी हे त्या क्षेत्रात कितीचे पॅकेज मिळते, याचाच पहिले विचार करतात. माझी आवड काय आहे, माझ्यामध्ये कोणते अंगभूत गुण आहेत, कोणते कौशल्य मी आत्मसात करू शकतो, माझ्या गुणांचा इतरही अनेक क्षेत्रांमध्ये कुठे कुठे चांगला उपयोग होऊ शकतो, त्याच्याबद्दलचा विचार बरेचदा कमी आढळतो. गर्दी जिकडे जात आहे, तिकडे अनेक विद्यार्थी हे ढकलले जातात.

आज देशात विविध क्षेत्रांमध्ये प्रचंड स्पर्धा आहे. अभियांत्रिकी क्षेत्रासाठी होणाऱ्या जेईई परीक्षेला दरवर्षी लाखो विद्यार्थी बसतात. त्यामधून आयआयटीसारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना देशातील सर्वोत्तम रँकमध्ये स्थान मिळवावे लागते. वैद्यकीय क्षेत्रात तर स्पर्धा आणखी तीव्र आहे. नीट परीक्षेला २० लाखांहून अधिक विद्यार्थी बसतात आणि सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएससाठी प्रवेश मिळवण्यासाठी अत्यंत उच्च गुण आणि चांगली श्रेणी आवश्यक असते.



प्रशासकीय सेवांचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यूपीएससी ही देशातील सर्वांत प्रतिष्ठेची परीक्षा मानली जाते. लाखो उमेदवार अर्ज करतात; परंतु अंतिम निवड काहीशे जणांचीच होते. त्यामध्येही आयएएस कॅडर मिळवण्यासाठी देशातील सर्वोच्च रँक मिळवावी लागते. यावरून स्पष्ट होते की कोणतेही मोठे यश सहज मिळत नाही; त्यामागे अनेक वर्षांची तयारी, सातत्य आणि मानसिक ताकद असते. मात्र, एक महत्त्वाचा प्रश्न येथे उपस्थित होतो. प्रत्येक विद्यार्थ्याने फक्त इंजिनीअर, डॉक्टर किंवा आयएएस होण्याचाच विचार करावा का? वास्तविक पाहता, आज अनेक क्षेत्रांमध्ये उत्तम करीअर संधी उपलब्ध आहेत. डेटा सायन्स, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सायबर सुरक्षा, संरक्षण संशोधन, व्यापारी जहाज सेवा, औद्योगिक सुरक्षा, कृषी तंत्रज्ञान, दळणवळण आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन (सप्लाय चेन मॅनेजमेंट) यासारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. अनेकदा विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे लक्ष काही मोजक्या पारंपरिक क्षेत्रांकडेच केंद्रित राहते; त्यामुळे इतर संधींकडे दुर्लक्ष होते. मोठ्या परीक्षा आणि स्पर्धांमध्ये यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांचा अभ्यास केला तर काही गुण समान दिसून येतात. त्यांच्याकडे स्पष्ट ध्येय असते. ते नियमित आणि सातत्यपूर्ण अभ्यास करतात. अपयश आले तरी खचून न जाता पुन्हा प्रयत्न करतात. वेळेचे योग्य नियोजन करतात आणि सोशल मीडियासारख्या विचलित करणाऱ्या गोष्टींपासून आवश्यक अंतर राखतात. आत्मविश्वास आणि शिस्त हे त्यांच्या यशाचे मुख्य आधारस्तंभ असतात.

यामध्ये पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची असते. मुलांवर अनावश्यक दबाव टाकण्याऐवजी त्यांना प्रोत्साहन देणे, इतर मुलांशी तुलना टाळणे, अभ्यासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे आणि त्यांच्या मानसिक आरोग्याची काळजी घेणे, ही पालकांची जबाबदारी आहे. तेजकुमार बंडीवार यांचे यश हे केवळ एका विद्यार्थ्याचे यश नाही. ते प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांसाठी प्रेरणेचा स्रोत आहेत. आजच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेची भीती न बाळगता स्वतःची क्षमता ओळखली पाहिजे.

अनेक वेळा भारत सरकार पद्म पुरस्कारांचे वितरण करते. त्यावेळेस ज्यांना तो पुरस्कार मिळालेला आहे, त्या व्यक्तींबद्दलची माहिती जेव्हा आपण वाचतो, तेव्हा असे लक्षात येते की समाजमान्य अभ्यासाच्या कोणत्याही क्षेत्रामध्ये यापैकी अनेक लोक कुठेही नव्हते; तरीही त्यांना इतका प्रतिष्ठेचा पद्म पुरस्कार मिळालेला आहे. यावरून आपल्या लक्षात येते की विद्यार्थी म्हणून सर्वसामान्य कामगिरी करताना त्यांनी मात्र माणूस म्हणून असामान्य कामगिरी केलेली असते.

तेजकुमारसारख्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या बातम्या ज्यावेळेस आपण वाचतो, त्यावेळेला नकळत पालकांच्या मनामध्ये इच्छा निर्माण होते की, आपल्याही मुलांनी अशा पद्धतीचे यश संपादन केले पाहिजे. ही भावना बरोबर आहे; परंतु अभ्यास मुलाला करायचा आहे, तुम्हाला नाही. यशस्वी त्याला व्हायचे आहे, तुम्हाला नाही. पालक त्याला यशस्वी होण्यासाठी मदत करू शकतात; परंतु त्याला चालायचे त्याच्याच पावलांनी आहे, उडायचे त्याला त्याच्याच पंखांनी आहे. ज्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या बातम्या आपण वर्तमानपत्रात वाचतो, ते एक दिवस काही काळासाठी प्रकाशामध्ये येतात; परंतु हा प्रकाश पाहण्यासाठी त्यांनी अनेक वर्षे स्वतःला मातीच्या अंधकारात गाडून घेतलेले असते. त्यावेळेस हे सर्व अप्रसिद्ध लोक असतात. अनेक वेळा लाखो विद्यार्थी ही परीक्षा देतात; त्यामध्ये तू कसा काय उत्तीर्ण होणार, अशा पद्धतीने त्यांची उपेक्षाही होते. अनेकांना यश हुलकावणी देत असते. अनेक वेळा संधींचा उपयोग करूनसुद्धा यश मिळत नाही. अशा वेळेस नैराश्याचा घोर अंधकार, त्यांच्या मनामध्ये निर्माण झालेला असतो. अशा वेळेस त्यातून मार्ग दाखवणारा कोणी मिळत नाही.

''तिमिरातून तेजाकडे'' जाण्याच्या त्यांच्या या मार्गात पालक आणि समाजाने साहाय्यभूत होण्याची, देशसेवेसाठी असे अनेक 'तेजकुमार' घडविण्याची आवश्यकता आहे, असे वाटते.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### संकटात... एक दिलासा

सध्या जगात इराण व अमेरिका यांच्यामधील युद्धामुळे तेल संकट तीव्र झाले आहे. जगभर तेलाचे भाव तर वाढले आहेत याशिवाय महागाईचा डोंब उठला आहे. आपल्या भारतातही परिस्थिती काही वेगळी नाही. इंधनाचे दर वाढले आहेत. इंधनाचे दर वाढताच इतर अनेक वस्तूंचे भाव गगनाला भिडले. मुलांचे शैक्षणिक साहित्य, गणवेशांची भाववाढ झाली आहे. याचा फायदा अनेकांनी घेतला आहे. हे सारे चालू असतानाच एक दिलासादायक बातमी हाती आली आहे. अंदमान बेटाच्या पूर्वेला १५ किलोमीटरवर खोल समुद्रात नैसर्गिक वायूचे मोठे साठे ऑईल इंडिया लिमिटेड या सरकारी तेल कंपनीला सापडले आहेत. या अस्थिरतेच्या काळात ऊर्जा सुरक्षा बळकट होण्याची शक्यता आहे. अंदमान बेटाच्या पूर्व किनाऱ्यावर खोल समुद्रात २५५ मीटरवर हे नैसर्गिक वायूचे साठे सापडले आहेत. याला केंद्राचे पेट्रोलियम खात्याचे मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी पुष्टी दिली आहे. सध्याच्या संकट काळात ही मोठी दिलासादायक बातमी आहे.

**शांताराम वाघ**/पुणे

### ...तर भारत काँग्रेसमुक्त होणार!

जागतिक तणावातही जीडीपी सुसाट, ही बातमी वाचली. जगात सर्वत्र सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीतही भारताने वार्षिक विकासदर ७.७ टक्के आणि जानेवारी २६ ते मार्च २६ या चौथ्या तिमाहीतील विकासदर ७.८ टक्के राखून आजही भारत हा जगातील सर्वांत जास्त दराने वाढणारी समर्थ अर्थव्यवस्था असल्यावर शिक्कामोर्तब केले आहे. या तिमाहीत एक महिना अमेरिका-इस्रायल आणि इराणमध्ये प्रत्यक्ष सुरू असलेल्या काळाचाही आहे. अर्थात हा विकासदर योगायोगाने आलेला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारची विकास धोरणे, दूरदृष्टी, मुत्सद्देगिरी, निर्णयक्षमता, राष्ट्र सर्वोपरी धोरण, आत्मनिर्भर भारताचा ध्यास, भ्रष्टाचारविरहित कारभार, पराकोटीची देशनिष्ठा, जनताजनार्दनाने पंतप्रधानांना दिलेली समर्थ साथ आणि गेली बारा वर्षे एकही दिवस सुट्टी न घेता पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या अथक परिश्रमांचा हा परिणाम आहे.

या पृष्ठभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींनी नुकत्याच दिलेल्या भाषणात देशात भयंकर आर्थिक त्सुनामी येणार असल्याचा इशारा दिला होता. त्यांनी आरोप केला की, केंद्रातील भाजप सरकारने देशाची सुरक्षा यंत्रणा कमकुवत केल्यामुळे अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय धोक्यांपासून असुरक्षित झाली आहे. याचबरोबर त्यांनी येत्या एक वर्षात नरेंद्र मोदी सरकार जाणार असल्याचे आणि आगामी काळात ते देशात आणिबाणी लागू करण्याची शक्यता असल्याचे अभ्यासपूर्ण जावईशोधही लावले आहेत. देशातील घटनात्मक संस्था असलेल्या सर्वोच्च न्यायालयातील काही न्यायमूर्ती आणि भारतीय निवडणूक आयोगातील काही आयुक्तदेशातील गंभीर परिस्थितीबद्दल आपल्याला धडाधड मेसेज पाठवत असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. अर्थात त्यांच्या या शोधांवर आणि भविष्यावर खुद्द काँग्रेस पक्षातील नेतेही विश्वास ठेवणार नाहीत तर जनतेने त्यांच्या वक्तव्याला किंमत देणे दूरच राहिले.

राहुल गांधींच्या नेतृत्वात काँग्रेसचा आजवर शंभरावर निवडणुकांमध्ये पराभव झाला आहे. या पराभवाची जबाबदारी राहुल गांधींनी घेऊन आत्मपरीक्षण करायला हवे होते. मात्र त्याऐवजी राहुल गांधींनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर शेलक्या शब्दांत टीका करण्याचा सपाटाच लावला आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे राहुल गांधींना आता एका ज्येष्ठ आणि हुशार मानसोपचारतज्ज्ञाची गरज आहे. ''परिवारमुक्त काँग्रेस झाली नाही तर काँग्रेसमुक्त भारत होणारच'', हे काँग्रेसच्या नेत्यांनी पक्के लक्षात ठेवावे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## वाचक पत्रे

### व्लादिमिर पुतिन यांची रणनीती चीनच्या हिताची

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या चीन भेटीनंतर तातडीने रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी चीनबरोबर महत्त्वाचे करार करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. सध्या जगभरात इंधन टंचाईमुळे मोठ्या संकटाची स्थिती निर्माण झाली आहे. परिणामी आर्थिक क्षेत्रातही मंदीचे वारे घोंगावत आहे. या सर्व परिस्थितीला तोंड देण्यासाठी रशिया आणि चीन या दोन्ही देशांत आगामी काळात मोठ्या प्रमाणात आदानप्रदान होण्याची शक्यता दिसत आहे. रशियाच्या सायबेरियन प्रदेशातून मंगोलियामार्गे चीनला नैसर्गिक वायू वाहून नेण्याची योजना पुतीन यांनी आखली आहे. परिणामी चीनसारख्या राष्ट्राला पुढील अनेक वर्षे नैसर्गिक वायूचा तुटवडा भासणार नाही. पश्चिम आशियातील युद्धग्रस्त स्थितीमुळे जगामधील तेल बाजारातील समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. होर्मुझमधून होणारी जहाजांची वाहतूक ठप्प झाल्यामुळे भारतासह अनेक देशांपुढे इंधन टंचाईचे संकट निर्माण होऊ शकते. चीनलादेखील या अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्या पृष्ठभूमीवर रशियाकून होणारे सहकार्य दीर्घकालीन हिताचे ठरणार आहे.

रशियाला स्वतःची अर्थव्यवस्था टिकवण्यासाठी आशियाई देशांवर विशेषतः चीनवर अवलंबून राहावे लागत आहे. २०२९ पर्यंत चीनचे वार्षिक ५२.५ अब्ज घनमीटर रशियन गॅसचा पुरवठा करण्याचे लक्ष्य आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बीडमधील पोखरीत तीन म्हशींचा संशयास्पद मृत्यू



**बीड :** तालुक्यातील पोखरी (घाट) येथील शेतकरी विश्वंभर मुरलीधर खिल्लारे यांच्या तीन दुभत्या म्हशींचा अवघ्या दोन दिवसांत संशयास्पद मृत्यू झाला असून चौथी म्हैसही मरणासन्न अवस्थेत आहे. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याचे सुमारे तीन लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या प्रकरणात विषप्रयोग झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून पशुवैद्यकीय विभागाच्या अनास्थेबाबतही नाराजी व्यक्त होत आहे. विश्वंभर खिल्लारे यांनी दिलेल्या माहितीनुसार, म्हशी आजारी पडताच त्यांनी लिंबागणेश येथील पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, फोन करूनही कोणीही तपासणीसाठी आले नसल्याचा आरोप त्यांनी केला. अखेर त्यांना खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून उपचार घ्यावे लागले. औषधोपचारासाठी सुमारे २० हजार रुपयांचा खर्च झाल्याचे त्यांनी सांगितले. या घटनेबाबत सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांच्याशी बोलताना विश्वंभर खिल्लारे यांनी तीव्र संताप व्यक्त केला. माणसाने हात धरून मारावे, पण मुक्या जनावरांचा तळतळाट घेऊ नये अशी उद्विग्न प्रतिक्रिया त्यांनी दिली. गेल्या वर्षीदेखील त्यांच्या चार गायींचा एकाचवेळी संशयास्पद मृत्यू झाल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून मृत जनावरांचे शवविच्छेदन अहवाल तपासावेत, विषप्रयोग झाला आहे का याचा शोध घ्यावा तसेच संबंधित शेतकऱ्याला नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## नियमांचे पालन करा; प्रवाशांचा विश्वास जिंका

**बीड :** बीड शहरातील रिक्षाचालक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील तसेच पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांची भेट घेऊन रिक्षा व्यवसायाशी संबंधित तसेच पार्किंग यासह विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी वाहतूक अधिकाऱ्यांनी रिक्षाचालकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या. रिक्षाचालकांनी गणवेश (ड्रेसकोड), अधिकृत बिल्ला (बॅच) आणि लायसन्स बाळगणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याचे आवाहनही करण्यात आले.

# लाचखोर पोलीस कर्मचाऱ्याला अटक झाल्यानंतर नागरिकांकडून फटाके फोडून जल्लोष

**नेकनूर :** पोलीस ठाण्यातील एका लाचखोर पोलीस अंमलदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडल्यानंतर नागरिकांनी चक्क फटाके फोडून आनंद व्यक्त केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अपघातात बळी गेलेल्या व्यक्तीच्या कुटुंबीयांकडे कागदपत्रांसाठी लाच मागणाऱ्या या कर्मचाऱ्याच्या अटकेनंतर परिसरातून हळहळ व्यक्त होण्याऐवजी समाधान व्यक्त केले जात आहे. या प्रकारानंतर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांनी नागरिकांना कोणत्याही कामासाठी लाच न देण्याचे आवाहन केले आहे.

संबंधित पोलीस अंमलदार नेकनूर पोलीस ठाण्यात मागील पाच वर्षांपासून कार्यरत होता. या हद्दीतील पवनचक्कीच्या कामांमुळे पोलिसांना नवीन आर्थिक मार्ग सापडला होता आणि हा कारभार या कर्मचाऱ्याकडे सोपवण्यात आला होता. मागील वर्षी पवनचक्कीला विरोध करणाऱ्या एका युवकाला चारित्र्य प्रमाणपत्र खराब करण्याची धमकी दिल्याचा व्हिडिओ समोर येऊनही तत्कालीन प्रभारी अधिकाऱ्यांनी या कर्मचाऱ्याची बाजू सावरून धरली होती. अशा अनेक प्रकरणांमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाठीशी घातल्यामुळे या कर्मचाऱ्याचे धाडस अधिकच वाढले होते. मागील वर्षी झालेल्या मोठ्या प्रमाणावरील बदल्यांचा गैरफायदा घेत काही जुन्या कर्मचाऱ्यांनी पोलीस ठाण्यात स्वतःची मक्तेदारी निर्माण केली होती. प्रभारी अधिकारी फारसे बाहेर पडत नसल्याचा फायदा उठवत मोजक्या कर्मचाऱ्यांनी लाचखोरीचा बाजार मांडला होता.

एका अपघातातील मृत व्यक्तीच्या कुटुंबाला पंचनामा आणि इतर आवश्यक कागदपत्रे देण्यासाठी या अंमलदाराने पंधरा हजार रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीअंती दहा हजार रुपये स्वीकारताना जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने या कर्मचाऱ्याला एका होमगार्डसह पोलीस ठाण्याच्या दारातच रंगेहाथ पकडले. लाचेची रक्कम घेण्यासाठी खासगी व्यक्ती किंवा होमगार्डचा वापर करण्याची पद्धत येथे अनेक वर्षांपासून सुरू होती, मात्र अखेर हा गैरप्रकार उघडकीस आला.

या कारवाईनंतर संबंधित कर्मचाऱ्याचा वाईट अनुभव आलेल्या नागरिकांनी सोशल मीडियावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कौतुक करणाऱ्या पोस्ट शेअर केल्या. काही नागरिकांनी तर रात्री पोलीस ठाण्याच्या समोरील बाजारतळावर गोळा होऊन फटाके फोडत आनंद व्यक्त केला. पोलीस ठाण्यातील हा अनागोंदी कारभार पाहून अवघ्या काही दिवसांपूर्वीच रुजू झालेले प्रभारी अधिकारी अचंबित झाले आहेत. त्यांनी पोलीस ठाण्यातील भ्रष्टाचार संपवण्यासाठी कडक पवित्रा घेतला असून, नागरिकांनी कोणत्याही कामासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याला पैसे देऊ नयेत आणि कोणी पैसे मागितल्यास थेट संपर्क साधावा, असे जाहीर आवाहन केले आहे.

# बीड-हिंगोलीत सैन्याची हरितक्रांती; सव्वा लाख वृक्षांचे यशस्वी संगोपन

**बीड, 08 जून :** छत्रपती संभाजीनगर येथील भारतीय सैन्य दलाच्या १३६ टी.ए. बटालियनने बीड आणि हिंगोली जिल्ह्यात पर्यावरण संवर्धनाचा एक अनोखा आणि प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या या सैनिकांनी आपल्या श्रमदानातून दोन वर्षांपूर्वी उजाड माळरानावर तब्बल सव्वा लाख वृक्षांची लागवड केली होती. योग्य नियोजन आणि अथक परिश्रमांच्या बळावर आज या झाडांचे यशस्वी संगोपन करून सैनिकांनी या भागात मोठी हरितक्रांती घडवून आणली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय आणि वनविभागाच्या सहकार्याने राबवण्यात आलेल्या या मोहिमेत सुरुवातीला ७० सैनिकांनी श्रमदान केले होते, तर सध्या ३० सैनिक नियमितपणे या झाडांची काळजी घेत आहेत. सैनिकांच्या या अनोख्या उपक्रमाचे पर्यावरणप्रेमी नागरिकांकडून सर्वत्र कौतुक होत आहे.

या मोहिमेसाठी धारूर येथील पोलिस ठाण्याच्या पाठीमागील सुमारे ३ हेक्टर उजाड गायरान क्षेत्राची निवड करण्यात आली होती, जेथे १० हजार झाडे लावण्यात आली. तसेच घागरवाडा परिसरातील १८५ हेक्टर क्षेत्र निश्चित करून तेथे सव्वा लाख वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. या दोन्ही ठिकाणी झाडांना पाणी देण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले जात आहेत. धारूर येथे किल्ल्याच्या विहिरीतील पाण्याचा वापर केला जात असून, घागरवाडा येथे साठवण तलावावर १० एचपी क्षमतेचा पंप बसवून पाणीपुरवठा केला जात आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश केवळ कागदावर न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून दाखवणाऱ्या सैनिक तुकडीचे प्रमुख कृष्णा जाधव यांनी सांगितले की, सध्या या झाडांची सैनिकांमार्फत व्यवस्थित जोपासना सुरू असून आगामी काळात आणखी वृक्षारोपण केले जाणार आहे.

# अधिक मास निमित्त श्रीमद् भागवत कथेतील दशम स्कंध कथा संपन्न

**पुणे(प्रतिनिधी :** पुण्यातील रहाटणी मधील नम्रता क्रिस्टल पार्क सोसायटी मध्ये अधिक मास निमित्त श्रीमद् भागवत कथा मधील दशम स्कंध कथा श्री संजय कुलकर्णी महाराज यांच्या रसाळ आणि अभ्यासपूर्ण मधुर वाणीतून संपन्न झाली, दिनांक.एक जून ते सात जून या कालावधीत श्री कृष्ण जन्मापासून ते कृष्ण अवताराच्या समाप्तीपर्यंत अत्यंत ओघवत्या भाषेत सर्व श्रोत्यांना विविध कथा आणि त्या कथेतील मर्म आणि अध्यात्म समजून सांगितले. तसेच विविध भजने सादर करीत सर्वांनाच मंत्रमुग्ध केले.त्यामुळे नम्रता क्रिस्टल पार्क आणि वर्धमान अंगण सोसायटी मधील ज्येष्ठ महिला आणि पुरुष यांची उपस्थित संख्या वाढत गेली सप्तम दिनी सामुदायिक आरती आणि महाप्रसादाने कथेची सांगता झाली, अशाच कथांचे,आणि प्रवचनाचे आयोजन केले जावे अशी प्रतिक्रिया नम्रता क्रिस्टल पार्क आणि वर्धमान अंगण सोसायटी मधील ज्येष्ठ सदस्य मंडळींनी व्यक्त केली. विना मोबदला सात दिवस कथा छान सांगितल्याबद्दल श्री संजय कुलकर्णी महाराज यांचे अभिनंदन आणि आभार व्यक्त केले जात आहेत. कथेच्या यशस्वीतेसाठी सर्व ज्येष्ठ महिला आणि पुरुष यांनी भरपूर परिश्रम घेतले.*

# परळीत कायदा-सुव्यवस्थेचे तीनतेरा-महादेव गंगणे पाटील

## गुन्हेगारांच्या दहशतीखाली शहर



**परळी | प्रतिनिधी :** एकेकाळी शांत आणि सुसंस्कृत शहर म्हणून ओळख असलेल्या परळी शहराची ओळख आता दिवसेंदिवस वाढत्या गुन्हेगारीमुळे मलिन होत चालली आहे. शहरात गेल्या काही महिन्यांपासून खून, जीवघेणे हल्ले, टोळीयुद्ध, सार्वजनिक ठिकाणी मारामाऱ्या, दहशत निर्माण करणाऱ्या घटना आणि कायद्याला खुलेआम आव्हान देणारे प्रकार सातत्याने घडत आहेत. त्यामुळे परळीतील सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. परळी शहरात कायदा संस्थेचे तीन तेरा झाले असून पोलीस प्रशासनाचा कसलेही प्रकारचा धाक उरला नसल्याने गुन्हेगारांचे मनोबल वाढले आहे. या बाबत आपण लवकरच बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांना भेटून निवेदन देणार असल्याचेही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे परळी शहराध्यक्ष महादेव गंगणे पाटील यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, गुन्हेगारीच्या घटना घडूनही संबंधितांवर कठोर आणि धाक निर्माण करणारी कारवाई होताना दिसत नसल्याने गुन्हेगारांचे मनोबल वाढत असल्याची चर्चा शहरभर सुरू आहे. कायद्याचा धाक उरला नसल्यामुळे गुन्हेगार भररस्त्यात, चौकाचौकात आणि सार्वजनिक ठिकाणी बिनधास्तपणे मारामाऱ्या करत असल्याचे चित्र आहे.

# बसवराज पाटील मुरुमकर विक्रमी मताधिक्याने विजयी होतील - डॉ. अर्चना पाटील चाकूरकर

**बीड :** महायुतीच्या कार्यकर्त्यांची मजबूत संघटनात्मक ताकद, विकासाभिमुख विचारसरणी आणि मतदारांचा वाढता पाठिंबा यामुळे बसवराज पाटील मुरूमकर हे विक्रमी मताधिक्याने विजयी होतील, असा ठाम विश्वास डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी व्यक्त केला.

धाराशिव बीड स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून महायुतीचे अधिकृत उमेदवार बसवराज पाटील मुरूमकर यांनी देवघर येथे भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान आगामी विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली.



लातूरधाराशिवबीड या महत्त्वाच्या विधान परिषद मतदारसंघातील निवडणूक राज्याच्या राजकारणात विशेष महत्त्वाची मानली जात आहे. महायुतीने या निवडणुकीसाठी बसवराज पाटील मुरूमकर यांना अधिकृत उमेदवारी दिल्यानंतर त्यांच्या प्रचाराला वेग आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी विविध राजकीय, सामाजिक आणि संघटनात्मक स्तरावरील मान्यवरांच्या भेटीगाठी सुरू केल्या आहेत. देवघर येथे झालेल्या या भेटीत निवडणुकीतील संभाव्य समीकरणे, मतदारसंघातील सध्याची राजकीय परिस्थिती, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सदस्यांचा प्रतिसाद तसेच महायुतीच्या विजयासाठी राबविण्यात येणाऱ्या रणनीतीवर चर्चा झाली.

डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, महायुती सरकारने राज्यात विकासाची गती कायम ठेवत विविध लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत. या विकासकामांचा आणि जनहिताच्या धोरणांचा सकारात्मक परिणाम मतदारांमध्ये दिसून येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांतील लोकप्रतिनिधी देखील महायुतीच्या भूमिकेला पाठिंबा देत असून त्याचा फायदा या निवडणुकीत निश्चितपणे होणार आहे. कार्यकर्त्यांची मजबूत फळी, संघटनात्मक बळ आणि विकासाच्या मुद्द्यांवर आधारित प्रचारामुळे बसवराज पाटील मुरूमकर यांचा विजय निश्चित असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बसवराज पाटील मुरूमकर यांनीही यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना महायुतीच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. मतदारसंघातील सर्व घटकांशी संवाद साधत विकासाचे प्रश्न प्राधान्याने मांडण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी तसेच लातूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

# अंबाजोगाईत 20 वर्षीय तरुणीवर गुंगीचे औषध देऊन तिच्यावर दोघांचा अत्याचार

**अंबाजोगाई :** अंबाजोगाईत महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या 20 वर्षीय तरुणीवर गुंगीचे औषध देऊन तिच्यावर दोघांनी अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हे नाराधम इथवरच थांबले नाही तर पीडित तरुणीकडून तीन लाख रुपयांसह साडेनऊ तोळे सोने देखील उकळले. हा संतापजनक प्रकार शनिवारी उघडकीस आल्यानंतर याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केज तालुक्यातील एक तरुणी अंबाजोगाई येथे महाविद्यालयात शिक्षणासाठी राहत असताना, याच काळात तिची ओळख महेश करपे, पवन कराड या दोन तरुणांशी झाली. नंतर हे दोन तरुण पीडित तरुणीचा सतत पाठलाग करत असत. एके दिवशी महेश करपे या तरुणाने तरुणीचा पाठलाग करून तिला जबरदस्तीने मंचुरियन खाऊ घातले. मंचुरियन खाल्याने तरुणीला गुंगी आली. त्यानंतर तिच्यावर या दोघांकडून अत्याचार करण्यात आले. पवन कराड या तरुणाने देखील गुंगीचे औषध देऊन पुणे येथील लॉजवर अत्याचार केला. नंतर तरुणीचे फोटो-व्हिडिओ तिचा कुटुंबातील लोकांना दाखवतो, अशी धमकी देऊन तिला ब्लॅकमेल करत तिच्यासोबत वारंवार शारीरिक संबंध ठेवले. या बाबत तरुणाने पोलीस ठाण्यात दिलेल्या कबुलीत म्हटले आहे. सध्या या प्रकरणाचा अधिकचा तपास पोलीस करत आहेत. मात्र या घटनेनं शहरात संतापाचं वातावरण निर्माण झालं असून पुन्हा एकदा महिलांवरील अत्याचाराच्या घटनेने शहर हादरलं आहे.

# यशासाठी ऑप्शन बी आवश्यक : सैफ अय्युब मुल्ला

**बीड (प्रतिनिधी) :** एमपीएससी किंवा यूपीएससी मध्ये यशाचे प्रमाण खूप कमी असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ स्पर्धा परीक्षांना सर्वस्व मानून त्यात आयुष्य पणाला लावण्यापेक्षा, नेहमी आपल्याकडे 'ऑप्शन बी' तयार असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पाटोदा तालुका पुरवठा अधिकारी सैफ अय्युब मुल्ला यांनी व्यक्त केले.

नालंदा फाउंडेशन, बीड यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. हा कार्यक्रम रविवार, दि.७ रोजी तुलसी फॅशन डिझाईन कॉलेज, पाटोदा येथे उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष मा.प्रा.प्रदिप रोडे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून उपशिक्षणाधिकारी मा.हनुमंत गव्हाणे, पाटोदा नगर नगरपंचायतीचे नगरसेवक मा.शेख इम्रान शेख नूर, महसूल अधिकारी मा.शेख रशीद, मा.गणेश कवडे, प्रा. राम गायकवाड, मा.प्रा.डी.डी. राऊत आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना सैफ अय्युब मुल्ला म्हणाले की, स्पर्धा परीक्षा हा एक प्रकारे 'अनिश्चिततेचा खेळ' आहे, जिथे मेहनत करूनही यश मिळेलच याची खात्री नसते. त्यामुळे तरुण वयातील ही महत्त्वाची आणि कुशल वर्षे फक्त एकाच गोष्टीच्या मागे लागून वाया घालवू नका. अभ्यास नक्की करा, कष्ट करा, पण त्याला सुरक्षित पर्यायाची जोड देण्यासाठी शिक्षणही सुरू ठेवा, असेही त्यांनी स्पष्ट केले. अध्यक्षीय मनोगतात प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांना महामानवांचे विचार आचरणात आणण्याचे आवाहन केले.

# पाणंद रस्ता वादातून महिलेसह शेतकऱ्यांवर हल्ला; काळेगाव हवेलीतील धक्कादायक प्रकार

**बीड :** जिल्हा प्रशासनाकडून पाणंद रस्ते मोकळे करून शेतकऱ्यांना न्याय दिल्याचा मोठा गाजावाजा केला जात असला, तरी प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असल्याचे काळेगाव हवेली (ता. बीड) येथे घडलेल्या घटनेतून समोर आले आहे. पाणंद रस्ता मोकळा करण्याच्या कामातून निर्माण झालेल्या वादातून एका महिलेसह शेतकऱ्यांवर हल्ला झाल्याची घटना घडली.



काळेगाव हवेली येथील कुंभार वस्तीवरील गट क्रमांक ४२२ व ४२३ मधील शेतरस्ता तहसील प्रशासन व भूमी अभिलेख विभागाने मोकळा करून दिला होता. मात्र त्यावेळी काही व्यक्तींनी रस्ता कामाला विरोध करत महसूल कर्मचाऱ्यांशी अरेरावीची भाषा केल्याचा आरोप आहे. याबाबत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना दूरध्वनीद्वारे माहिती देण्यात आली होती. मात्र कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचे संबंधित शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

जखमींना फिर्याद नोंदविण्यासाठी पिंपळनेर पोलीस ठाण्यात नेण्यात आले. पोलिसांनी वैद्यकीय तपासणीसाठी त्यांना जिल्हा रुग्णालय, बीड येथे पाठविल्याची माहिती मिळाली आहे.

डॉ. गणेश ढवळे यांनी प्रशासनावर टीका करत म्हटले की, महसूल व भूमी अभिलेख अधिकाऱ्यांसमोरच रस्ता कामाला विरोध करण्यात आला होता. त्यावेळी संबंधितांवर कारवाई झाली असती तर घटना घडली नसती. शेतरस्ते अडवणाऱ्यांवर कठोर कारवाईच्या घोषणा केवळ कागदोपत्रीच असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे."

या घटनेमुळे पाणंद रस्ते मोकळे करण्याच्या सरकारी मोहिमेच्या अंमलबजावणीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# लालबहादूर शास्त्री विद्यालयाची बासर आणि कंदकुर्ती येथे शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

उदगीर(त भा वृत्तसेवा) लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसीय अभ्यास व स्नेह सहलीचे नुकतेच यशस्वी आयोजन करण्यात आले होते. रोजच्या शैक्षणिक कामकाजातून थोडा विसावा मिळावा आणि शिक्षकांमध्ये परस्पर सुसंवाद वाढावा, या उद्देशाने या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीदरम्यान तेलंगणा व तेलंगणा-महाराष्ट्र सीमेवरील प्रसिद्ध धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्यात आल्या. सहलीची सुरुवात प्रसिद्ध विद्यादेवी सरस्वती माता मंदिर, बासर (तेलंगणा) येथून झाली. सर्व शिक्षक वृंदाने देवीचे दर्शन घेऊन विद्यालयाच्या आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी प्रार्थना केली.

या नंतर आर्य वैश्य वासवी येथे सहभोजन करण्यात आले. दोन सत्रा मध्ये सहलीचे नियोजन करण्यात आले

दर्शन घेऊन आल्यानंतर वासवी भवन येथे पहिल्या सत्राची सुरुवात प्रार्थनेने झाली. सामूहिक सरस्वती स्तवन प्रीती शेंडे यांनी घेतले.

आशा गौतम यांनी बासर येथील सरस्वती मंदिराची माहिती व बासर परिसरातील प्रेक्षणीय स्थळांची माहिती सांगितली.

त्यानंतर गोदावरी नदीच्या विस्तीर्ण पात्राचे व परिसराचे दर्शन घेण्यात आले. दुसऱ्या सत्रामध्ये

बासरनंतर सहलीचा ताफा कंदकुर्ती या ऐतिहासिक आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणाकडे रवाना झाला. कंदकुर्ती येथे गोदावरी, मांजरा आणि हरिद्रा या तीन नद्यांचा पवित्र त्रिवेणी संगम होतो. या संगमाचे विहंगम दृश्य शिक्षकांनी जवळून अनुभवले.



तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या पूर्वजांचे मूळ गाव असलेल्या या ऐतिहासिक भूमीला शिक्षकांनी भेट दिली .आणि तेथील स्मृती मंदिराचे दर्शन घेतले.

या ठिकाणी डॉ केशव बळीराम हेडगेवार यांच्या विषयीची व कार्याविषयीची माहिती व त्यांचा एकूण इतिहास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आ.ना डांगे यांनी सांगितली. प्रार्थना परमानंद निलंगे व संदीप जाधव यांनी घेतली .वैयक्तिक गीत गोपाळ जोशी यांनी गायले व या सत्राचे सूत्रसंचालन प्रमोद कुलकर्णी यांनी केले.

शिक्षण विभागाच्या सर्व नियमांचे व सुरक्षा उपाययोजनांचे पालन करून ही सहल अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली.

दिवसभर झालेल्या या अभ्यासपूर्ण आणि आनंददायी प्रवासामुळे सर्व शिक्षकांमध्ये एक नवा उत्साह निर्माण झाला आहे. ही सहल यशस्वी करण्यासाठी सहल प्रमुख विनायक इंगळे, नीता मोरे यांनी परिश्रम घेतले

या सहलीमध्ये संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलूरकर, शीलाताई आलूरकर स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार अर्थ समितीचे अध्यक्ष ॲड शिवाजीराव बिरादार प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष व्यंकटराव गुरमे, गजानन जगळपुरे, मुख्याध्यापक शैलेंद्रजी कंगळे प्राथमिकचे मुख्याध्यापक अंकुश मीरगुडे उपमुख्याध्यापक ज्ञानेश मातेकर पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट अनेक संघ कार्यकर्ते व सर्व प्राथमिक माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

सहलीतील दोन्ही सत्राचे आयोजन नीता मोरे यांनी केले व आभार प्रमोदिनी रेड्डी यांनी व्यक्त केले. या सहलीच्या यशस्वीतेसाठी व्यवस्थेतील सर्वच शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# हिंगोली नगर पालिकेत कंत्राटी कर्मचारी भरतीचा आढावा

## स्वच्छता कर्मचाऱ्यांना कार्यालयात न बसवण्याचे गटनेत्याचे निर्देश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जून**
हिंगोली पालिकेच्या सभागृहात सोमवारी कंत्राटी कर्मचारी भरती संदर्भात एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. नगरपालिकेचे गटनेते श्रीराम बांगर आणि मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत व अध्यक्षतेखाली ही बैठक घेण्यात आली. नगरपालिकेचा कारभार अधिक गतिमान करण्यासाठी आऊटसोर्सिंगच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या या भरती प्रक्रियेचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. या बैठकीला आऊटसोर्सिंग कंपनीचे प्रमुख, पालिकेचे उपाध्यक्ष तसेच विविध नगरसेवक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हिंगोली नगरपालिकेमध्ये सध्या आऊटसोर्सिंगच्या माध्यमातून विविध विभागांतील रिक्त जागांवर कर्मचाऱ्यांची भरती केली जाणार आहे. या भरतीसाठी ज्या उमेदवारांनी अर्ज केले होते, त्या सर्वच उमेदवारांना आजच्या बैठकीसाठी पाचारण करण्यात आले होते. बैठकीदरम्यान उपस्थित सर्व उमेदवारांच्या कामाच्या अनुभवाबाबतची माहिती प्रत्यक्ष जाणून घेण्यात आली. ज्या उमेदवारांना संबंधित कामाचा पूर्वअनुभव आहे, अशा उमेदवारांना प्राधान्याने नियुक्ती देण्यासंदर्भात बैठकीत सकारात्मक चर्चा करण्यात आली. सदर कर्मचाऱ्यांची भरती ही संपूर्णतः आऊटसोर्सिंगच्या (बाह्यस्रोत) माध्यमातून केली जात आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांचे मानधन, पगार आणि इतर ज्या काही आवश्यक कायदेशीर सुविधा असतील, त्या सर्व आऊटसोर्सिंग कंपनीच्या माध्यमातूनच दिल्या जातील, असे गटनेते श्रीराम बांगर यांनी यावेळी स्पष्ट केले.

**कामचुकारपणा खपवून घेणार नाही; बांगर यांचा इशारा**
या आढावा बैठकीमध्ये गटनेते श्रीराम बांगर यांनी पालिकेच्या सर्वच विभागांतील कर्मचाऱ्यांना वेळेवर आणि प्रामाणिकपणे काम करण्याच्या कडक सूचना दिल्या. विशेषतः शहराच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या स्वच्छता विभागाच्या कामकाजावर त्यांनी नाराजी व्यक्त करत मुख्याधिकाऱ्यांना थेट निर्देश दिले. स्वच्छता विभागामध्ये कार्यरत असलेल्या सर्वच कर्मचाऱ्यांना केवळ कार्यालयामध्ये बसवून न ठेवता, त्यांना प्रत्यक्ष प्रभागात आणि मैदानावर कामाला लावा, अशा स्पष्ट सूचना त्यांनी मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांना दिल्या.
शहरातील विकासकामे आणि नागरी सुविधा वेळेत पूर्ण करण्यासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांची ही भरती महत्त्वाची ठरणार असून, अनुभवी हातांना काम मिळणार असल्याने पालिकेच्या कारभारात सुधारणा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मोंढा, रिसाला बाजार येथील रहीवाशांसाठी प्रयत्न करणार

## अतिक्रमण नोटीस प्रकरणावर आ. मुटकुळेंची भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जून**
शहरात फलटण मोंढा आणि रिसाला बाजार भागात अतिक्रमण संदर्भात नागरिकांना प्रशासनाकडून नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. ज्या नागरिकांच्या घराच्या जागेवर सातबारा उताऱ्यामध्ये 'सरकार' असे नमूद आहे, अशाच लोकांना या नोटिसा मिळाल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, २०११ पूर्वीच्या सर्व रहिवाशांची घरे शासन निर्णयानुसार नियमित केली जाणार असून, नागरिकांनी कोणत्याही परिस्थितीमध्ये घाबरून जाण्याची गरज नाही, असे ठाम प्रतिपादन हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी केले.
रिसाला बाजार परिसरामध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका महत्त्वपूर्ण कॉर्नर बैठकीत आमदार मुटकुळे बोलत होते. यावेळी स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत नागरिकांशी संवाद साधताना आमदार तानाजीराव मुटकुळे म्हणाले की, फलटण मोंढा आणि रिसाला बाजार भागातील ही घरे आजची नसून, जवळपास दोनशे ते तीनशे वर्षांपूर्वीची जुनी घरे आहेत. या भागातील नागरिकांचे पिढ्यानपिढ्या येथे वास्तव्य आहे. त्यामुळे केवळ सातबारा उताऱ्यावर 'सरकार' नाव आहे म्हणून कोणाचेही घर पाडले जाणार नाही. २०११ पूर्वी जे नागरिक वास्तव्यास आहेत, त्यांना हक्काचे घर नियमित करून देण्याचा स्पष्ट जीआर सरकारने काढलेला आहे.
या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठ आमदार मुटकुळे यांनी पुढाकार घेतला आहे उद्याच या भागातील सर्व नागरिकांची आवश्यक त कागदपत्रे जमा केली जातील. त्यानंतर महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भे घेऊन हा संपूर्ण विषय त्यांच्या कानावर घातल जाईल आणि नागरिकांना न्याय मिळवून दिल जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.
शासकीय नियमांची माहिती देताना आमदारांन स्पष्ट केले की, सरकार तर्फे १५०० स्क्वेअर फू एवढी जागा नागरिकांना पूर्णपणे विनामूल्य करून दिली जाणार आहे.
जर एखाद्या नागरिकाची जागा १५०० स्क्वेअर फ टांपेक्षा जास्त असेल, तर त्या अतिरिक्त जमिनीव अगदी नॉमिनल (नाममात्र) टॅक्स भरून ती जाग देखील संबंधित नागरिकाच्या नावावर करून दिल जाईल.
या संवेदनशील परिस्थितीचा फायदा घेऊन काह जण नागरिकांची दिशाभूल करण्याची किंव आर्थिक फसवणूक करण्याची शक्यता नाकारत येत नाही. त्यामुळे रिसाला बाजार आणि फलटण मोंढा भागातील नागरिकांनी कोणत्याही भूलथापांन किंवा कुणाच्याही आमिषाला बळी पडू नये. आमदार म्हणून मी पूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी उभ आहे, असे जाहीर आवाहन आमदार तानाजीरा मुटकुळे यांनी यावेळी केले. आ. मुटकुळेंच्य आश्वासनानंतर या भागातील रहीवाशांना काह अंशी दिलासा मिळाला आहे.

# धोंडे जेवणानिमित्त पाहुण्यांना आ. मुटकुळेंमडून रोपांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ जून**
अधिकमासाचे औचित्य साधून हिंगोली विधानसभेचे कार्यसम्राट आमदार तान्हाजी मुटकुळे यांच्या वतीने शहरातील 'यमुना' या निवासस्थानी ७ जून रोजी स्नेहमिलन व पारंपरिक धोंडे जेवणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार मुटकुळे यांनी कार्यक्रमाला आलेल्या सर्व पाहुण्यांचे स्वागत नेहमीच्या पुष्पगुच्छांऐवजी औषधी व छायादार झाडांची रोपटी देऊन केले. राजकीय व्यासपीठावर सामाजिक आणि पर्यावरणीय भान जपणारा हा अनोखा उपक्रम सध्या संपूर्ण जिल्हाभरात कौतुकाचा आणि चर्चेचा विषय ठरला आहे.
या भव्य कार्यक्रमाचे अचूक आणि नेटके नियोजन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे यांनी केले होते. अधिकमासात जावई आणि नातेवाईकांना धोंडे जेवण घालण्याची जुनी परंपरा आहे. मात्र, या पारंपरिक सणाला सामाजिक उत्तरदायित्वाची जोड देत, निसर्गाचा समतोल राखण्यासाठी आलेल्या प्रत्येक नागरिकाला वृक्षारोपणाचा संदेश या माध्यमातून देण्यात आला. आमदारांच्या या कौतुकास्पद उपक्रमामुळे उपस्थित पाहुण्यांनीही आनंद व्यक्त करत ही रोपटी आपल्या घरी आवर्जून लावण्याचा व जोपासण्याचा संकल्प केला.
या स्नेहमिलन व धोंडे जेवणाच्या कार्यक्रमाला हिंगोली जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि व्यापारी क्षेत्रातील दिग्गज नेत्यांनी हजेरी लावली होती. आलेल्या प्रत्येक पाहुण्याची आस्थेने चौकशी करत आमदारांनी स्वतः संवाद साधला. पारंपरिक भोजन आणि त्याला मिळालेली पर्यावरणपूरक स्वागताची जोड यामुळे हा सोहळा केवळ एक कौटुंबिक किंवा राजकीय मेळावा न राहता, जिल्ह्यात एक नवा आदर्श घालून देणारा ठरला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### आज उबाठा शिवसेनेचे आक्रोश आंदोलन
हिंगोली- राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, शेतकऱ्यांना खत व बियाणे वाजवी दरात उपलब्ध करून द्यावेत, खते व बियाणांचे कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, पेट्रोल डिझेलचे वाढत्या दरांवर नियंत्रण ठेवून दरकपात करावी, शेतीसाठी लागणाऱ्या सर्व कृषी निविष्ठांच्या किंमती कमी कराव्यात, नीट पेपरफुटी व इतर गैरप्रकारांची सखोल चौकशी करावी, जीवनाश्यक वस्तू स्वस्त कराव्यात जलजीवन योजनेतील भ्रष्टाचाराची चौकशी करावी, संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, शक्तीपीठ मार्ग रद्द करावा आदी मागण्यांसाठी दि ९ जून रोजी उबाठा शिवसेनेच्यावतीने आक्रोश आंदोलन करण्यात येणार आहे. येथील महात्मा गांधी चौकात सकाळी साडे दहा वाजता आंदोलन करण्यात येणार असून या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा प्रमुख गोपू पाटील सावंत यांनी केले आहे.

### दुध ग्राहक व डेरी मालकांनी सतर्क रहावे
वसमत- शहरात सध्या दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. काही ठिकाणी केमिकलयुक्त भेसळ दूध डेरी व ग्राहकांपर्यंत पोहोचत असल्याची चर्चा सोशल मीडियावर जोर धरत असून, यामुळे जनतेच्या आरोग्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. दूध हा लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्यांच्या दैनंदिन आहारातील महत्त्वाचा घटक आहे. अशा परिस्थितीत जर दुधामध्ये कृत्रिम रसायने, पावडर किंवा इतर भेसळयुक्त पदार्थ मिसळले जात असतील, तर त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊ शकतो. पोटाचे विकार, अन्नविषबाधा तसेच दीर्घकालीन आरोग्य समस्या निर्माण होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जाते.
संबंधित यंत्रनाने दूध संकलन केंद्रे, डेऱ्या व पुरवठादारांची नियमित तपासणी करण्याची मागणी जोर धरत आहे. तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाने अचानक धाडी टाकून दुधाचे नमुने तपासावेत, दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, सोशल मीडियावर सुरू असलेल्या चर्चांची सत्यता संबंधित तपासणीनंतरच स्पष्ट होणार असली, तरी आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कोणाचा पाठिंबा? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दूध ग्राहकांनीही सतर्क राहून संशयास्पद दूध किंवा दुग्धजन्य पदार्थ आढळल्यास संबंधित विभागाकडे तक्रार करावी, जनतेच्या आरोग्याशी संबंधित विषय असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.



हिंगोली- शहरात सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला. छाया- सुनील पाठक

# बार कौन्सिलच्या निवडणुकीत ॲड सतीश देशमुख यांचा विजय



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जून**
महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलच्या सदस्य पदी हिंगोली जिल्ह्याचे सुपुत्र ॲड. सतीष देशमुख यांची नऊ हजार सहाशे मतांनी प्रचंड विजयी होऊन तिसर्यांदा हिंगोली जिल्ह्याचे नाव महाराष्ट्र व गोवा राज्याच्या शिरपेताच रोवले आहे.
महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलची निवडणूक अडीच महिन्यांपुर्वी झाली होती. ६ जून रोजी महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलच्या निवडणूकीचा निकाल जाहिर झाला. हिंगोली जिल्ह्यांचे सुपूत्र ॲड. सतिष देशमुख हे निवडणूकीच्या रिंगणात तिसर्यंदा होते. या निवडणूकीत ॲड. सतिष देशमुख यांना पहिल्या पसंतीचे १४३१ मते पडली. तर महाराष्ट्र व गोवा राज्यातून ९६०० मते घेवून प्रचंड मतांनी ॲड. सतिष देशमुख हे विजयी झाले आहेत. ही निवडणूक २३ सदस्य पदासाठी महाराष्ट्र व गोवा राज्यात झाली. १८ पुरूष व ५ महिला या पदासाठी निवडणुकीच्या रिंगणामध्ये होते. ॲड. सतीष अंबादास देशमुख यांनी २०१० मध्ये महाराष्ट्र आणि गोवा राज्याच्या सदस्य पदासाठी निवडणुक लढवून प्रथमच हिंगोली जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व केल्यानंतर सतत तिसर्यांदा ॲड. देशमुख यांनी बाजी मारत ९६०० मते घेवून हिंगोली जिल्ह्याचा झेंडा महाराष्ट्र आणि गोवा राज्यात रोवला आहे. बार कौन्सिल ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष ही भुषविले आहे. त्यांच्या कार्यकाळात हिंगोली येथे पतसंस्था स्थापन करत जिल्हा व सत्र न्यायालय स्थापनेमध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे. निवडीनंतर फटाक्यांची आतिषबाजी करीत जल्लोष साजरा करण्यात आला.

# हिंगोलीत फिट इंडिया उत्सव अंतर्गत सायकल रॅलीचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जून**
हिंगोली जिल्हा पोलीस दलाच्या वतीने इंडिया उत्सव अंतर्गत संडे ऑन सायकल रॅली चे आयोजन सकाळी सात वाजता मैदान येथे करण्यात आले होते. या सायकल रॅलीला हिरवी झेंडी वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक गफार शेख यावेळी एस आर पी एफ असिस्टंट कमांडर नरवाडे, शेख नफीस पैलवान अभय भारतीय, डॉक्टर शिंदे, आदींची प्रमुख उपस्थिती होती. ही सायकल रॅली संत नामदेव पोलीस कवाय तिथून सुरुवात करण्यात आली असून ही सायकल रॅली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, अकोला बायपास, गारमाळ रोड, खटकाळी बायपास या मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालय, बस स्थानक ,तसेच संत नामदेव पोलीस कवायत मैदानावर संपन्न करण्यात आली. या सायकल रॅलीत वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी, एस आर पी एफ चे कर्मचारी, यांच्यासह इतरांनी सहभाग नोंदवला होता सहभाग नोंदविलेल्या प्रत्येक सायकल स्वारांन प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. या सायकल रॅलीत प्रथम क्रमांक संतोष हरिभाऊ केकन, द्वितीय मारुती बोबडे, तृतीय वैष्णव मिटकर, चतुर्थ अविनाश बोथीकर, पाचवा क्रमांक कैलास मिटकर हे आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन हिंगोली शहर वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आले होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवाजी पारस्कर, नंदकिशो महाजन, सतिश मोडक, संतोष घुगे, शशिकांत भिसै, संजय चव्हाण, सुखदेव जाधव,खरबळ राजकुमार सुर्वे, विद्या भुजबळे, मीरा सोनपावले विलास शिनगारे, कपिल जाधव, चंद्रशेखर देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

# जिल्हा माहेश्वरी सभेच्या अध्यक्षपदी प्रमोद मुंदडा, सचिवपदी प्रशांत सोनी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जून**
हिंगोली जिल्हा महेश्वरी सभेच्या संघटनात्मक निवडणूका २०२६ ते २९ या वर्षा करिता घेण्यात आल्या असता त्यात सर्व पदांची बिनविरोध निवड करण्यात आली निर्वाचन अधिकारी म्हणून ॲड. हरिष मुरक्या व सहाय्यक सिए. रामदेव सोनी, यांनी काम पाहिले.
प्रमोद मुंदडा हिंगोली जिल्हा अध्यक्ष, सुरेश धुत जिल्हा उपाध्यक्ष, प्रशांत सोनी जिल्हा सचिव, बालमुकुंद जेथलिया सेनगाव जिल्हा सहसचिव, श्याम मंत्री वसमत जिल्हा कोषाध्यक्ष, उमेश सोमाणी कळमनुरी जिल्हा संघटन मंत्री, सुमित लखोटिया जवळा बाजार जिल्हा प्रचार प्रसार मंत्री अशी निवड करण्यात आली. या बैठकीला बंकटलाल गट्टानी, नंदकिशोर तोष्णीवाल, बद्रीनारायण सारडा,कमल दरक, योगेश तोष्णीवाल, शैलेश तोष्णीवाल, पवन राठी, प्रविण चांडक, आशिष पोरवाल, लक्ष्मीरमण काबरा, संजय सोमाणी, श्रीराम सोमाणी, राहूल लाहोटी, संजय काबरा, योगेश तोष्णीवाल वसमत, सौ. राजश्री किशोर मुंदडा, सौ. सुषमा विनोद चितलांगीया यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

# शेतकरी कर्जमाफीच्या शासन निर्णयाची शेतकऱ्यांकडून होळी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जून**
राज्य शासनाने जाहीर केलेली कर्जमाफी योजना ही शेतकऱ्यांची दिशाभूल करणारी असून कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम सरकार करीत असल्याचा आरोप क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्यावतीने करण्यात आला. सोमवारी गोरेगाव येथे संघटनेची पदाधिकारी व शेतकऱ्यांनी कर्जमुक्तीच्या शासन निर्णयाची प्रतिकात्मक होळी केली. यावेळी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करीत सरसकट कर्जमाफीची मागणी करण्यात आली.
राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहीर केली असली तरी त्यामध्ये अनेक अटी व शर्ती लावून मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना लाभापासून वंचीत ठेवण्यात आले आहे. त्यामुळे ही योजना प्रत्यक्षात कर्जमाफी नसून कर्ज वसुली योजना असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.
यावेळी बोलतांना क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे गजानन कावरखे म्हणाले की, निवडणुकीपूर्वी राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले होते. दोन लाखापर्यंतचे कर्ज माफ करण्याचे जाहीरपणे सांगितले होते. मात्र प्रत्यक्ष शासन निर्णयात विविध निकष आणि अटी लावून लाखो शेतकऱ्यांन कर्जमाफीपासून वंचीत ठेवण्याच प्रयत्न केल्या जात आहे सरकारनेआपल्या आश्वासनाच मान राखून सर्व पात्र शेतकऱ्यांन सरसकट कर्जमाफी द्यावी अशी मागणी केली.
शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने दुर्लक्ष केल्यास संपूर्ण राज्यात आंदोलन करण्याचा इशार संघटनेच्यावतीने देण्यात आल आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष नामदेव पतंगे, प्रवीण मते, उध्दव कावरखे, अनिल कावरखे मारूती लाखोळे, अमोल एकशिंगे, विठ्ठल सावके, नामदेव काळे, अशोक कावरखे, प्रकाश भुरभूरे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## घरफोडी करून ६० हजारांचे सोयाबीन लंपास

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.८ जून -**

वाशी तालुक्यातील ब्रम्हगाव येथे अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून घरातील सुमारे ६० हजार रुपये किमतीचे सोयाबीन चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सचिन ज्ञानोबा वायसे (वय ४३, रा. ब्रम्हगाव, ता. वाशी, जि. धाराशिव) यांच्या घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने ६ जून २०२६ रोजी रात्री ११.३० ते ७ जून २०२६ रोजी सकाळी ६.३० या कालावधीत तोडून घरात प्रवेश केला.



यावेळी घरात ठेवलेले ३० कट्टे सोयाबीन, एकूण अंदाजे ६० हजार रुपये किमतीचा माल चोरून नेण्यात आला.

या प्रकरणी सचिन वायसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### येरमाळा पोलीस ठाण्याचे एपीआय यशवंत घोडके यांचा सत्कार

**वाशी, ८ जून -**

येरमाळा पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकपदी (एपीआय) नवी जबाबदारी स्वीकारल्याबद्दल यशवंत घोडके यांचा तेरखेडा येथील युवकांच्या वतीने ५ जून रोजी सत्कार करण्यात आला. युवकांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील बोजगुडे, शिवसेना नेते बालाजी घोलप, संदीप देशमुख, नितीन घुले, काका उमरदंड, विजय वाघमारे, नारायण खाते यांच्यासह तेरखेडा येथील युवक उपस्थित होते. परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट व्हावी, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.



### लक्ष्मीकांत ढगे यांना ‘आदर्श समाजरत्न पुरस्कार’

**भूम, ८ जून -**

बँकिंग कर्ज व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून हजारो उद्योजकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणारे उद्योजक व समाजसेवक लक्ष्मीकांत ढगे (संस्थापक, शताक्षी लोन सर्व्हिसेस) यांना राज्यस्तरीय ‘आदर्श समाजरत्न पुरस्कार’ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र दिनानिमित्त पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळाच्या राजवाडे हॉलमध्ये ७ जून रोजी आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात हा सन्मान देण्यात आला. डॉ. श्याम विश्वंभर लोकेरे प्रमुख अतिथी तर सीए डॉ. शंकर धर्मादास अंडोळा अध्यक्षस्थानी होते. धाराशिव जिल्ह्यातील भूम तालुक्यातील चिंचपूर ढगे येथील रहिवासी असलेल्या लक्ष्मीकांत ढगे यांनी शताक्षी लोन सर्व्हिसेसच्या माध्यमातून अनेक उद्योजकांना बँक कर्जप्रकरणे मार्गी लावण्यासाठी तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना ‘आदर्श समाजरत्न पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.



### यशस्वी विद्यार्थ्यांचा उपनगराध्यक्ष रोचकरी यांच्या हस्ते सत्कार

**तुळजापूर, ८ जून -**

प्रभाग क्रमांक ११ मधील दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी यांच्या पुढाकाराने करण्यात आला. यावेळी रामचंद्र रोचकरी व निलेश रोचकरी यांनी विद्यार्थ्यांचा गौरव करून शुभेच्छा दिल्या. यावेळी मार्गदर्शन करताना रामचंद्र रोचकरी म्हणाले की, बारावीनंतर विद्यार्थ्यांसमोर शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध असतात. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडी व क्षमतेनुसार योग्य अभ्यासक्रमाची निवड करून जीवनात यश मिळवण्यासाठी प्रयत्नशील राहावे. विद्यार्थ्यांचे कौतुक केल्याने त्यांना अधिक प्रोत्साहन मिळते, त्यामुळे हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास दहावी-बारावीतील यशस्वी विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कळंब न.प. फेल! : पहिल्याच पावसात कळंब शहर जलमय

## नगराध्यक्षा सुनंदा कापसे यांची तातडीची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जून -**

शहरात झालेल्या पहिल्याच दमदार पावसाने अनेक भागांमध्ये पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले. नाल्यांमधील अडथळे, साचलेला गाळ आणि काही ठिकाणी झालेल्या अतिक्रमणांमुळे पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्याने नागरिकांच्या घरांमध्येही पाणी शिरल्याच्या घटना घडल्या.

या परिस्थितीची गंभीर दखल घेत नगराध्यक्षा सुनंदा कापसे यांनी नगर परिषद प्रशासन व कर्मचाऱ्यांसह शहरातील विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेत संबंधित विभागाला तात्काळ उपाययोजना राबविण्याच्या सूचना दिल्या.

पाहणीदरम्यान अनेक ठिकाणी नाल्यांवरील अतिक्रमणे आणि साचलेल्या गाळामुळे पाण्याचा निचरा होत नसल्याचे निदर्शनास आले.

त्यामुळे पावसाचे पाणी रस्त्यांवर तसेच घरांमध्ये शिरत असल्याचे स्पष्ट झाले. यावेळी नगराध्यक्षा कापसे यांनी नागरिकांना स्वयंस्फूर्तीने नाल्यांवरील अतिक्रमणे हटवून स्वच्छता मोहिमेत सहकार्य करण्याचे आवाहन केले. शहरातील ज्या भागांमध्ये वारंवार पाणी साचण्याची समस्या निर्माण होते, त्या ठिकाणी जेसीबीच्या सहाय्याने गाळ काढणे, नाले साफ करणे आणि पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

पावसाळ्यात नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी नगर परिषद प्रशासन सतर्क असून आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने राबविण्यात येत आहेत. नागरिकांनीही स्वच्छता आणि अतिक्रमण निर्मूलन मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्षा सुनंदा कापसे यांनी केले.



दरम्यान, नगर परिषद प्रशासनाकडून शहरातील नाले, गटारे आणि पाणी निचऱ्याच्या मार्गांची विशेष तपासणी सुरू असून भविष्यात अशा समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नियोजनबद्ध उपाययोजना करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

याप्रसंगी कर्मचारी कल्याण गायकवाड, श्रीमती भालेराव यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेची मोटार व केबल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जून -**

तुळजापूर तालुक्यातील काटगाव येथील ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेची पाणबुडी मोटार व केबल वायर अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ जून २०२६ रोजी दुपारी ३ ते २ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने काटगाव येथील हरणी तलावातील विहिरीवर बसविण्यात आलेली ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेची पाणबुडी मोटार व केबल वायर असा एकूण ३२ हजार रुपये किमतीचा साहित्य चोरून नेला.

या प्रकरणी ग्रामपंचायत शिपाई परशुराम बाबुराव मुळे (रा. काटगाव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव) यांनी ७ जून रोजी दिलेल्या फिर्यादीवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास नळदुर्ग पोलीस करीत आहेत.

## वादळी पावसामुळे जिल्ह्यात मोठे नुकसान; शेतकरी व नागरिकांना तात्काळ मदत द्या : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ जून -**

जिल्ह्यात अलीकडेच वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना तात्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी मोठी झाडे उन्मळून पडली असून वीजवाहिन्यांचे नुकसान झाल्याने अनेक भागांतील वीजपुरवठा खंडित झाला आहे. काही ठिकाणी पुलांची पडझड झाली असून रस्त्यांवर झाडे कोसळल्याने वाहतुकीस अडथळे निर्माण झाले आहेत. त्यामुळे नागरिकांना दैनंदिन कामकाजात मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.



याशिवाय शेतकऱ्यांच्या फळबागा, उभी पिके तसेच इतर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

आधीच विविध नैसर्गिक व आर्थिक संकटांना सामोरे जाणाऱ्या शेतकरी वर्गास या आपत्तीचा मोठा फटका बसला असून त्यांना तातडीच्या मदतीची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महसूल, कृषी व संबंधित विभागांना तात्काळ नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण करून पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत, रस्त्यांवरील पडलेली झाडे व इतर अडथळे हटवून वाहतूक सुरळीत करावी तसेच नुकसानग्रस्त शेतकरी व फळबागधारकांना शासनाच्या नियमानुसार त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केली आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन प्रभावित नागरिकांना त्वरित दिलासा द्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

## टोलनाक्याजवळ भीषण अपघात : दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू; अज्ञात वाहनचालक फरार

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.८ जून -**

भूम तालुक्यातील सोन्नेवाडी शिवारातील टोलनाक्याजवळ रविवारी (दि. ७) दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास दोन वाहनांमध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील दोघा युवकांचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोन्नेवाडी येथील उत्तरेश्वर आप्पासाहेब साठे (वय ४५) आणि वाशी तालुक्यातील शेळगाव येथील आबासाहेब निवृत्ती खराडे (वय ३८) हे दोघे एमएच-२५ एझेड-३१५५ क्रमांकाच्या दुचाकीवरून पारगावकडून आपल्या गावाकडे जात होते. दरम्यान, पिंपळगाव फाट्याजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली.



धडकेनंतर अज्ञात वाहन दुचाकीवरील दोघांच्या अंगावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळी न थांबता वाहनासह पसार झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. फरार अज्ञात वाहनाचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

## पर्यावरण क्षेत्रातील कार्याची दखल; दयानंद पाटील यांची जिल्हाध्यक्षपदी निवड



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ जून -**

जिल्हा परिषद प्रशाला तुगाव येथील प्राथमिक पदवीधर शिक्षक दयानंद पाटील यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ (महाराष्ट्र राज्य) या संस्थेच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील राळेगणसिद्धी येथे संस्थेचे राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच पार पडले. यावेळी पर्यावरण संरक्षण, वृक्षसंवर्धन, जनजागृती, वृक्षारोपण तसेच पर्यावरण संवर्धनासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन दयानंद पाटील यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली.

दयानंद पाटील यांनी शिक्षकी पेशासोबतच पर्यावरण संरक्षणासाठी विविध उपक्रम राबवून समाजात जनजागृती निर्माण करण्याचे कार्य केले आहे.

त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून संस्थेने त्यांची धाराशिव जिल्हाध्यक्षपदी निवड केली आहे.

या निवडीबद्दल शैक्षणिक, सामाजिक व पर्यावरण क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून पुढील काळात त्यांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## उमरग्यात शिवराज्याभिषेक दिनानिमित्त अभिषेक व रक्तदान शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ जून -**

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त उमरगा शहरासह तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहरातील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिषेक करून अभिवादन करण्यात आले, तर शिवगर्जना परिवाराच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात ५१ शिवभक्तांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

सकाळी प्रविण शिंदे यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिषेक करण्यात आला. यावेळी आमदार प्रवीण स्वामी, जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, प्रा. सुरेश बिराजदार, नगराध्यक्ष किरण गायकवाड, बाळासाहेब माने, माजी नगरसेवक विक्रमबापू बिराजदार, रणधीर पवार, नगरसेवक सचिन जाधव, शरद पवार, नगरसेविका दिपाली विक्रमबापू बिराजदार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

रक्तदान शिबिरास शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवगर्जना परिवाराचे प्रमुख प्रेमा शिंदे, प्रा. सचिन शिंदे, राकेश कवाळे, अरुण कुंभार, निखिल बिराजदार, अभय जोगी, वेदांत दूधभाते, संकेत हळेखेडकर आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप कायदा रद्द करा; तुळजापुरातील महंत-पुजाऱ्यांचा तीव्र विरोध

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ जून -**

महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६ या प्रस्तावित कायद्याला केवळ स्थगिती न देता तो पूर्णपणे रद्द करण्यात यावा, अशी जोरदार मागणी तुळजापूर येथील महंत व पुजारी वर्गाने केली आहे. या कायद्याविरोधात शहरातील सर्व महंत व पुजाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत ६ जून रोजी पुजारी मंडळाच्या कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन शासनाच्या भूमिकेचा निषेध केला.

या पत्रकार परिषदेला महंत मावजीनाथ महाराज, महंत इच्छागिरी महाराज, पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपीन शिंदे, भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष



अमर कदम, धनंजय लोंढे, अजय साळुंके, संजय पेंदे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना महंत मावजीनाथ



महाराज म्हणाले की, मंदिरांमध्ये अखंडित धार्मिक सेवा सुरू राहाव्यात तसेच भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी पूर्वीपासून मठ व मंदिरांना जमिनी देण्यात आल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून या जमिनी देवस्थानांच्या नावावर असून सरकारने त्यामध्ये हस्तक्षेप करू नये. सध्या या कायद्याला स्थगिती देण्यात आली असली तरी तो कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा. उलट देवस्थानांच्या जमिनींवर अतिक्रमण होऊ नये यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

निजामकालातही देवस्थानांच्या जमिनींना संरक्षण मिळाले होते. मग हिंदू देवस्थानांच्या जमिनींसाठी वेगळा कायदा का केला जात आहे, असा सवाल उपस्थित करत वक्फ बोर्डाच्या जमिनींसाठी आणि हिंदू देवस्थानांच्या जमिनींसाठी वेगवेगळी भूमिका का घेतली जाते, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

महंत इच्छागिरी महाराज यांनी सांगितले की, देवस्थानांच्या जमिनींचे खरे मालक देवदेवता आहेत. मंदिरांची देखभाल, धार्मिक कार्ये आणि भाविकांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या जमिनी पूर्वीपासून देण्यात आल्या आहेत. अनेक देवस्थानांच्या जमिनींवर सध्या अतिक्रमणे झाली असून सरकारने मंदिरांचे संरक्षण करणारे कायदे करावेत. मंदिरांची अखंडित सेवा बाधित होईल असे कायदे करू नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

भोपे पुजारी मंडळाचे अध्यक्ष अमर कदम यांनीही शासनाच्या प्रस्तावित कायद्यावर टीका केली. देवस्थानांच्या जमिनी ताब्यात घेण्यामागे पुढे मंदिरांचे उत्पन्न आणि व्यवस्थापन सरकारच्या नियंत्रणाखाली आणण्याचा हेतू असल्याचा आरोप त्यांनी केला. देवस्थानांच्या जमिनींच्या माध्यमातून मंदिरांवर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही.

आवश्यक असल्यास महंत, पुजारी आणि भाविक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील, असा इशाराही त्यांनी दिला.

# अल-निनोच्या जनजागृतीसाठी कृषी विभागाच्या गावोगावी १३ हजार गाव बैठकांचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ जुन -**

उत्पन्न आणि उत्पादनाच्या दृष्टीने खरीप हंगाम अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मान्सूनच्या अनिश्चिततेमुळे पिकांवर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी कृषी विभागाने जनजागृती मोहिमेला वेग दिला आहे. यंदा मान्सूनवर 'अल-निनो'चा प्रभाव पडण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केल्याने शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यावर भर दिला जात आहे.

नांदेड जिल्ह्यात आतापर्यंत सुमारे १३ हजार जनजागृती मोहिमा राबविण्यात आल्या असून, एका सहायक कृषी अधिकाऱ्याने सरासरी ३७ मोहिमा पूर्ण केल्या आहेत. या मोहिमा पुढेही सुरू राहणार असून, त्यात जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

कृषी विभागाच्या नियोजनानुसार प्रत्येक सहायक कृषी अधिकाऱ्याने किमान ५० मोहिमा घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच पेरणीपासून काढणीपर्यंतच्या सर्व टप्प्यांबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे अनिवार्य करण्यात आले आहे. पेरणीपूर्व काळात प्रत्येक सहायक कृषी अधिकाऱ्याने दोन कार्यशाळांचे आयोजन केले आहे.

गेल्या वर्षी खरीप पिके अंतिम टप्प्यात असताना अतिवृष्टी आणि सततच्या पावसामुळे उत्पादनात घट झाली होती. यंदा पेरणीपूर्वीच 'अल-निनो'चे संकट निर्माण होण्याची शक्यता असल्याने कृषी विभाग अधिक सतर्क झाला आहे. संभाव्य परिणामांना तोंड देण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने विविध मोहिमा आणि कार्यशाळा आयोजित केल्या जात आहेत.

या कार्यशाळांचे आयोजन गावांमध्ये लोकप्रतिनिधींच्या सहभागाने सकाळी किंवा रात्री केले जात आहे. विभागीय कृषी सहसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी आणि सहायक कृषी अधिकारी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेत आहेत.

बदलत्या हवामानाचा विचार करून पीक नियोजन, पीक पद्धतीतील बदल, पाणी व्यवस्थापन आणि इतर आवश्यक कृषी उपाययोजनांबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना संभाव्य हवामान बदलांचा सामना करण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**मोहिमांचे स्वरुप काय ?**

शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य नियोजनाची जोड मिळावी याकरिता कृषी विभागाकडून प्रयत्न केले जात आहेत. यामध्ये पेरणी पुर्व मोहीम व पेरणी पश्चात मोहीमेचा समावेश आहे.

**पेरणी पुर्व मोहीम -** माती परीक्षणाच्या आधारे कृषी निविष्ठाच्या वाजवी वापरासाठी मोहीम, टंचाई परिस्थितीत फळबागा वाचविणे व फळबाग लागवडीमध्ये सीआरए तंत्रज्ञानाचा वापर, अल निनो बाबत जागरुकता करणेसाठी शिवार फेरीचे आयोजन, घरगुती चाचणी पद्धतीने बियाण्यांची उगवणक्षमता तपासणी प्रात्यक्षिक मोहीम, बीज प्रक्रिया मोहीम, बीबीएफद्वारे उताराला आडवी पेरणीचा प्रचार व प्रसार करणे, सापळा पिकांची लागवड बाबत प्रचार व प्रसार करणे, शून्य/कमी मशागत पद्धत अवलंब करणे, खरीप हंगाम तयारी व प्रमुख खरीप पिकांच्या तंत्रज्ञान प्रसारासाठी गावनिहाय प्रशिक्षण, पाणी फौंडेशन डिजिटल शेतीशाळा बाबत प्रचार व प्रसिद्धी, मग्रारोहयो अंतर्गत फळबाग लागवड प्रचार व प्रसिद्धी, महाविस्तार प व कृषी विषयक माहिती तंत्रज्ञानाच्या साधने बाबत प्रचार व प्रसिद्धी.

**पेरणी पश्चात मोहीम -** हिरवळीच्या खतांची निर्मिती, बायोफर्टीलायझर, बायोपेस्टीसाईड निर्मितीसाठी शेतावर फार्म लॅब स्थापन, निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, निमास्त्र, ब्रह्मास्त्र, जीवामृत, बिजामृत, घनजीवामृत यांसारख्या जैविक निविष्ठा निर्मिती करणेबाबत प्रचार प्रसिद्धी करणे,ऊस पाचट व्यवस्थापन,हुमणी कीड एकात्मिक व्यवस्थापन मोहीम,शंखी गोगलगाय निर्मुलन जनजागृती मोहीम,बोंड अळी एकात्मिक व्यवस्थापन मोहीम तसेच कार्यशाळा गावोगावी आयोजित करण्यात येत आहेत.

# मातृभूमीच्या रक्षणासाठी सज्ज!

## नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाचे ८ वीर सुपुत्रांची भारतीय सैन्य दलात ऐतिहासिक झेप

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ जुन -**

नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय, नांदेड येथील एन.सी.सी. विभागासाठी अत्यंत अभिमानाची आणि गौरवास्पद कामगिरी, महाविद्यालयाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवावी अशी अभूतपूर्व कामगिरी करत,एकाच भरती प्रक्रियेत महाविद्यालयातील आठ (०८) एन.सी.सी. कॅडेट्सची भारतीय सैन्य दलात देशसेवेसाठी निवड झाली आहे. ही केवळ विद्यार्थ्यांचीच नव्हे तर महाविद्यालय, एन.सी.सी. विभाग, पालक आणि संपूर्ण नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे.

भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या कॅडेट्समध्ये स्वराज हनुमंत बोरगावे, निलेश उद्धव राठोड, स्वप्निल रामदास लुटे, त्रिभुवन तुळशीराम नागरगोजे, सौरभ रतन कंधारे, ओमकार संतोष शिंदे, ओमकार नारायण सूर्यवंशी, श्रीनिवास माधव पुयड या सर्व राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. देशसेवेचे सर्वोच्च ध्येय समोर ठेवून कठोर परिश्रम, शिस्त, समर्पण आणि जिद्दीच्या बळावर या सर्व कॅडेट्सनी हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या ऐतिहासिक यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. सर्व यशस्वी एन.सी.सी कॅडेट्सला लेफ्टनंट डॉ. किशोर इंगळे एन.सी.सी अधिकारी तथा संख्याशास्त्र विभाग प्रमुख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या या सर्व आठ (०८) छात्र सैनिकांचा अभिनव भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.बालासाहेब पांडे, कोषाध्यक्ष कैलाशचंद काला, सहसचिव धनंजय जोशी यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी बालासाहेब पांडे म्हणाले की, महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेचे छात्र दरवर्षी सातत्याने भारतीय सैन्यदलात दाखल होत आहेत व ते सेवेसाठी त्यांचे योगदान अमूल्य आहे याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. तसेच यावेळी एन सी.सी अधिकारी तथा संख्याशास्त्र विभाग प्रमुख लेफ्टनंट डॉ.किशोर इंगळे मार्गदर्शन करताना म्हणाले की, भारत देश हा तरुणांचा देश आहे त्यामुळे देशाला राष्ट्रप्रेम राष्ट्रहित जोपासणारे तरुणांची गरज आहे. एन.सी.सीच्या विद्यार्थ्यांनी या सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा आदर्श समोर ठेवून राष्ट्रहित व राष्ट्रप्रेम जोपासावे. तसेच सर्वसामान्यांमध्ये राष्ट्रप्रेम जागृत करावे असे आवाहन केले.

या सत्काराला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.महेंद्रकुमार कुलकर्णी, उपप्रचार्य सौ.कल्पना कदम,प्रा.मनीष देशपांडे तसेच डॉ. पंकज यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच या निवडीबद्दल संस्थेचे कोषाध्यक्ष कैलासचंद काला, सचिवा ड सौ.वनिता ताई जोशी, सहसचिव धनंजय जोशी, ५२ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी नांदेड चे कमांडिंग ऑफिसर कर्नल दिलीप रेड्डी व अन्य मान्यवरांनी सर्व कॅडेटला भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील सर्व राष्ट्रीय छात्र सैनिक प्राध्यापक ,प्राध्यापिका, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.



**देगलूर- आमदार जितेश अंतापुरकर यांना दै. तरुण भारत वर्धापनदिनाचे विशेषांक भेट देताना देगलूर तालुका प्रतिनिधी मिलिंद वाघमारे**

# माजी नगरसेवक सोनू वाघमारेसह सामाजिक कार्यकर्त्यांचा वंचित बहुजन आघाडीत प्रवेश

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ८ जुन -**

उमरी शहरासह तालुक्यात आंबेडकर चळवळीचे अग्रेसर कार्य करणारे माजी नगरसेवक प्र सोनू वाघमारे यांनी असंख्य कार्यकत्या सोबत वंचित बहुजन आघाडी मध्ये प्रवेश केल्याने आंबेडकर चळवळीला पक्षा अंतर्गत नवसंजिवणी मिळाली आहे .

नगरसेवक प्र सोनू वाघमारे हे नेहमी सामाजीक कार्यक्षेत्रात माहेर आहेत त्यांनी राष्ट्रवादी पक्षाचे नगरसेवक असतानां अनेक वार्डातील समस्माचे निर्वाण केले अनेक महापूरुषाच्या जयंती दिनी त्यांनी पुढाकार घेवून सहकार्य करतात त्यांचे अठरा पगड जातीतील समाजाशी त्यांनी मानुसकीची नाळ जोडलेली आहे . म्हणून राष्ट्रवादी नेत्यानी नगरसेवक उमेदवारी दिली ते निवडून आले कालांतराने सत्ता सत्यतेतील भष्ट्राचार शिष्टाचार त्यांच्या विरोधी गेल्याने त्यांना पुन्हा राष्ट्रवादी पक्षांतर केलेल्या सत्ताधारानी त्यांना डावळले . पुन्हा सोनू वाघमारे यांनी राजकारणा पेक्षा समाज कार्यच महान आहे म्हणून सामाजिक कार्याला तेवड्यात वेगाने सुरुवात केली सामाजिक कार्यकर्ताना त्यांनी स्वाभीमान घान ठेवला नाही पण उमरी शहरात राजकीय नेते पक्ष बदलून चार चार धाम पूर्ण केले पण सोनू वाघमारे यांच्या कार्याची जाणीव एका पक्षाना झाली नाही त्यांचे सामाजिक कार्य इतराना वंचित म्हणून खटकल्या गेले त्यांनी सामाजिक बांधीलकी जोपासून कोरोणाच्या काळात ही पुढाकार घेतला , वृक्षारोपन ' अनेक शिबीरे , रक्तदान , संविधान दरवर्षी गौरवदिन , वाढदिवस , लग्नसोहळा , अंत्यविधी या सारखे कार्यक्रमत सहभाघेवून आंबेडकर चळवळीच्या संघटनेला योगदान दिले त्यामुळे नगरसेवक सोनू वाघमारे यांनी स्वाभीमानाने



वंचित बहुजन आघाडी मध्ये श्रध्देय नेते बाळासाहेब आंबेडकर व सुजात दादा आंबेडकर याच्या कार्याला प्रेरीत होवुन नांदेड जिल्ह्यातील तालुका उमरी येथील माजी नगरसेवक सोनू वाघमारे अनेक कार्यकर्त्याचा वंचित बहुजन अघाडी या पक्षात नांदेड येथे पक्ष सोहळा प्रवेश केला . या वेळी युवा आघाडीचे राज्य कार्यकरणी प्रदेश सदस्य अक्षय बनसोडे वंचित आघाडीचे नांदेड दक्षिन जिल्हाध्यक्ष शंकर महाजन जिल्हा महासचिव रवि पंडीत,जिल्हा उपाध्यक्ष विनायक गजभारे, गणपत सोनकांबळे,कायदे विषयक सल्लागार जयपाल ढवळे, युवा जिल्हा महासचिव वैभव लष्करे,युवा शहर अध्यक्ष गोपालसिंग टाक,शहर महासचिव सिध्दोधन कांपसीकर, सह ईतर पदआधिकारी उपस्थीत होते. या वेळी उमरी नगरपालिकेचे मा नगरसेवक प्र सोनु वाघमारे, युवा पॅथरचे ता.आध्यक्ष सचिन खंडलोटे, गंगाधर गच्चे, राजु सरोदे, आनिल हैबते,लक्ष्मन खंदारे, राहुल खंदारे, वैभव गायकवाड, पपडी लोखंडे, आशोक खंडलोटे, संजय डोगरे, बाबुराव कांबळे, नागनाथ खंडलोटे, सुरेश खंडलोटे, दिपक गायकवाड,सौरभ वाघमारे,तुषार वाघमारे, सुशांत वाघमारे सह अंसख्य कार्यकर्त्यानी वंचित बहुजन आघाडी मध्ये प्रवेश केले आहे माजी नगरसेवक सोनू वाघमारे यांच्या मुळे पक्षाना उमरी तालुक्यात बळ मिळाले आहे.

## सुरेश रंगेनवार यांची राष्ट्रवादीच्या किनवट विधानसभा कार्याध्यक्षपदी निवड

**किनवट** -राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजितदादा पवार गट) यांच्या किनवट विधानसभा कार्याध्यक्षपदी ज्येष्ठ नेते सुरेश रंगेनवार यांची नुकत्याच संपन्न झालेल्या पक्षाच्या बैठकीत निवड करण्यात आली. पक्ष संघटनेत दीर्घकाळ केलेले कार्य, ग्रामीण भागातील दांडगा जनसंपर्क तसेच प्रभावी संघटन कौशल्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविली आहे. ही निवड आमदार प्रताप



पाटील चिखलीकर यांच्या हस्ते जाहीर करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, माजी आमदार सुभाष साबणे, माजी जिल्हा परिषद सदस्य गोजेगावकर, युवा नेते सचिन नाईक, विधानसभा प्रमुख वैजनाथ करपुडे पाटील यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते. सुरेश रंगेनवार यांनी यापूर्वी संयुक्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे किनवट तालुका अध्यक्ष म्हणून यशस्वीपणे काम पाहिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटना ग्रामीण भागात अधिक मजबूत झाली होती. पक्षाच्या विचारधारेचा प्रचार आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना एकत्रित करण्याचे काम त्यांनी प्रभावीपणे केले आहे. त्यांच्या निवडीमुळे किनवट विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला नवसंजीवनी मिळणार असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक बळकट होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. निवडीनंतर सुरेश रंगेनवार यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानत, पक्षाने माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी मी पूर्ण ताकदीने काम करणार असून, ग्रामीण भागातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

## मोटार सायकल वाहनासाठी नवीन मालिका सुरु

**नांदेड** - परिवहनेतर संवर्गातील मोटार सायकल वाहनांसाठी चक२६-ऊ ही नवीन मालिका लवकरच सुरु होणार आहे. ज्या अर्जदारांना पसंती क्रमांक घ्यावयाचा आहे त्यांचे (आधारकार्ड, पॅनकार्ड, मोबाईल नंबर व ईमेलसह) अर्ज बुधवार १० जून २०२६ रोजी दुपारी २.३० पर्यंत स्विकारण्यात येणार आहेत. या अर्जासोबत संबंधीत पसंती क्रमांकाच्या शुल्काचा धनादेश (डी.डी) सुध्दा सादर करावा. मुदतीनंतर व वेळेनंतर पसंती क्रमांकासाठी अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. ज्या पसंती क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास १० जून २०२६ रोजी दुपारी ४ वा. दूरध्वनीद्वारे संबंधीत अर्जदारास कळविण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# अहमदपूर येथे शिवा वीरशैव-लिंगायत गोलमेज परिषद

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ जुन -**

जनगणना २०२६-२७ मध्ये धर्म व जातीची नोंद कशी करावी, महात्मा बसवेश्वरांचा बाराव्या शतकातील मूळ अनुभव मंडप व परसु कट्टा मुक्त करून जगभरातील पर्यटकांना पाहण्यासाठी खुला करा आणि महात्मा बसवेश्वर यांची देशभर शासकीय जयंती साजरी करा या दोन मागण्यांसाठी रामलिला मैदान नवी दिल्ली येथे धडक मोर्चा काढण्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे आवश्यक आहे. म्हणून वीरशैव परंपरेतील व विरक्त परंपरेतील सर्व मठाधिपती (शिवाचार्य), शिव कीर्तनकार, प्रवचनकार, गायक-वादक, शिवा संघटनेचे प्रमुख पदाधिकारी व समाजातील बौद्धिक अभ्यासक, साहित्यिक यांची बैठक शिवा संघटनेच्या वतीने आयोजित गोलमेज परिषद बुधवार, दि. १० जून २०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथे शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहरजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली आहे.

वीरशैव-लिंगायत समाजाचे मूलभूत प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रा. मनोहरजी धोंडे यांच्या नेतृत्वाखाली शिवा अखिल भारतीय युवक संघटना गेली ३० वर्षे देशभरात व देशाच्या बाहेरील राज्यात काम करत आहे. शिवा संघटनेच्या माध्यमातून समाजातील १८ पगड जातींना बरोबर घेऊन काम करण्याची संकल्पना प्रा. मनोहरजी धोंडे यांच्या विचारातून साकार होत आहे. वीरशैव-लिंगायत धर्मामधील राज्यातील तरुणांनी आदर्श घ्यावा, अशा पद्धतीची आजपर्यंत अनेक समाजहित जोपासणारी व समाजाच्या न्याय हक्काचे शेकडो प्रश्न शासन दरबारी सोडवून समाजाला न्याय मिळवून देण्यात आला आहे. येणाऱ्या काळात वीरशैव-लिंगायत समाजाची महाराष्ट्र राज्यामध्ये एक वज्रमूठ बांधून समाजाला एका व्यासपीठावर एकत्रित आणण्याचे कार्य शिवा संघटना करत आहे. येणाऱ्या जनगणना २०२६-२०२७ मध्ये वीरशैव-लिंगायत समाजाने धर्म व जातीची नोंद कशी करावी, याविषयी या गोलमेज परिषदेत चर्चा होऊन एकमुखाने निर्णय होणार आहे. तसेच प्रा. मनोहरजी धोंडे यांचे मार्गदर्शन होणार आहे.

नांदेड जिल्ह्यातील वीरशैव-लिंगायत समाजातील मठाधिपती, शिव कीर्तनकार, प्रवचनकार, बौद्धिक अभ्यासक, शिवा संघटनेचे पदाधिकारी व समाज बांधवांनी सदरील गोलमेज परिषदेस उपस्थित राहावे, असे आवाहन शिवा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोनसुरे, शिवा कर्मचारी महासंघाचे कार्यकारी अध्यक्ष विठ्ठल ताकबिडे, शिवा कर्मचारी महासंघाचे राज्य सरचिटणीस संजय कोठाळे, मराठवाडा अध्यक्ष वीरभद्र बसापुरे, शिवा संघटनेचे नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख इंजि. अनिल माळगे, मराठवाडा उपाध्यक्ष दिगंबर मांजरमकर, मराठवाडा संघटक डॉ. वैजनाथ हंगरगे आदीसह अनेकांनी केले आहे.





# दहा दिवसीय श्रामणेर शिबीर उत्साहात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ८ जुन -**

देगलूर तालुक्यातील सुजायतपूर येथील जेतवन शैक्षणिक, सामाजिक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या अंतर्गत चालू असलेल्या दहा दिवसीय श्रामणेर शिबिराचा शनिवार, दि. ६ जून रोजी समारोप करण्यात आला आहे. मार्गदर्शक भंते पय्याबोधी महाथेरो प्रशिक्षण केंद्र खुरगाव नांदुसा नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली हे दहा दिवसीय शिबीर घेण्यात आले होते. प्रशिक्षक म्हणून भंते दीपरत्न उस्माननगर नांदेड हे होते.

या श्रामणेर शिबिराच्या आयोजिका सावित्रीताई शेवाळकर ह्या होत्या. त्यांचे देगलूर परिसरात सर्वांनी चांगल्या आयोजनाबद्दल कौतुक केले आहे. श्रामणेर शिबीर चांगल्याप्रकारे पार पडले असून दरवर्षी हे शिबीर घेण्यात यावे, असे मत पालकांनी व्यक्त केले. संस्थेने सर्वांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन शिबिरार्थी व पालकांचा सत्कार केला. सूत्रसंचालन कु. मधू अडकुते यांनी केले, तर मिलिंद वाघमारे यांनी आभार मानले.




# किनवट तालुक्यात पिक विमा रखडला; शेतकरी आर्थिक संकटात

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ८ जुन -**

तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामातील सोयाबीन पिकाच्या विम्याची रक्कम अद्याप पूर्णतः प्राप्त झालेली नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. तालुक्यातील दहेली व शिवणी मंडळातील शेतकऱ्यांच्या खात्यात पिक विम्याची रक्कम जमा झाली असली, तरी उर्वरित सात मंडळांतील शेतकऱ्यांना अद्याप विमा मिळालेला नाही. मिळालेल्या माहितीनुसार, इस्लापूर, जलधारा, बोधडी, किनवट, मोहपूर, उमरी बाजार व मांडवी या मंडळांतील शेतकऱ्यांचे विम्याचे पैसे येणे बाकी आहेत. यापैकी काही मंडळांचे प्रस्ताव मंजूर झाल्याचे नोंदींमध्ये दर्शविले जात असले, तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा झालेली नाही. राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम प्रलंबित असल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे, काही मंडळांसाठी विमा मंजुरीची प्रक्रिया पूर्ण झाल्याचे दाखविले जात असले तरी शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळालेला नाही. तर जलधारा आणि उमरी बाजार मंडळांच्या बाबतीत विमा मंजूर झाल्याची नोंदही अद्याप उपलब्ध नसल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, मृग नक्षत्र सुरू झाले असून खरीप पेरणीचा हंगाम तोंडावर आला आहे. हवामान तज्ज्ञांनी यंदा एल-निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता वर्तविली आहे. अशा परिस्थितीत बियाणे, खते, मशागत, मजुरी व इतर शेतीकामांसाठी शेतकऱ्यांना तातडीने निधीची आवश्यकता आहे. पिक विम्याची रक्कम वेळेत न मिळाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांवर आर्थिक ताण वाढला असून काहींना कर्जाचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे शासनाने आणि संबंधित विमा कंपनीने उर्वरित मंडळांतील शेतकऱ्यांचे प्रलंबित दावे तातडीने निकाली काढून विम्याची रक्कम त्यांच्या खात्यात जमा करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. पिक विम्याची रक्कम लवकर प्राप्त झाल्यास आगामी पेरणीच्या कामांना गती मिळून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे मत शेतकरी व्यक्त करीत आहेत.